मंगळवार, १२ डिसेंबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १२१
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक




• MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 12 DECEMBER. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | • YEAR-03 • ISSUE-121 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05

# सरकारला शेतकऱ्यांच्या कष्टाची किंमत नाही

## राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवारांचा सरकारवर हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक : कांदा हे जिरायती शेतकऱ्यांचे पीक आहे. कांदा असे पीक आहे की, त्यामधून दोन पैसे मिळतात. त्यासाठीच शेतकरी कष्ट करतात. पण केंद्रात बसलेल्या सत्ताधाऱ्यांना शेतकऱ्यांच्या भावनांची किंमत नाही. देशाच्या अर्थव्यवस्थेत नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांची नोंद आहे. केंद्र सरकारला शेतकऱ्यांबद्दल आस्था राहिलेली नाही, शेतकरी हवालदिल झाले आहेत. सरकारने कांदा निर्यातबंदी उठवलीच पाहिजे, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी म्हटले आहे.**



शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली नाशिक जिल्ह्यातील चांदवड येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. त्यावेळी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले. चांदवडच्या दिशेने येत असताना जागोजागी शेतकरी शरद पवार साहेब यांना भेटून निवेदन देत होते. शरद पवार साहेब यांनी या प्रकरणात मध्यस्थी करावी आणि कांदा निर्यातबंदीचा निर्णय केंद्र सरकारला मागे घ्यायला लावावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात आली.

शरद पवार साहेब म्हणाले की, कांद्याच्या संदर्भात केंद्राने निर्यात बंदीचा निर्णय घेतला. यामुळे आपणास रस्त्यावर उतरावे लागले. आजच्या आंदोलनामुळे दिल्ली सरकारची झोप उडाली असेल. परंतु रास्ता रोको केल्याशिवाय दिल्लीला कळत नाही. आता आंदोलनानंतर दिल्लीश्वरांना कांद्याची निर्यातबंदी उठवावीच लागणार आहे. रास्ता रोकोतून केंद्र सरकारला आज संदेश दिला. आता उद्या दिल्लीत जाऊन संसदेत शेतकऱ्यांची व्यथा मांडणार असल्याचे शरद पवार यांनी म्हटले.

ते म्हणाले की, कांदा हे जिरायती शेतकऱ्यांचं पीक आहे. कांदा असं पीक आहे की, त्यामधून दोन पैसे मिळतात. त्यासाठीच शेतकरी कष्ट करतात. पण केंद्रात बसलेल्या सत्ताधाऱ्यांना शेतकऱ्यांच्या भावनांची किंमत नाही. कांदा हे लहान व जिरायती शेतकऱ्यांचं पीक आहे. पण दुर्दैवाने ज्यांच्या हातात देशाचे धोरण ठरवायचे अधिकार आहेत, त्यांच्यादृष्टीने शेतकऱ्यांच्या कष्टाला किंमत मिळावी, ही भावना नाही. केंद्र सरकारमध्ये बसलेल्या लोकांना ही जाण नसेल तर शेतकरी उद्ध्वस्त व्हायला वेळ लागणार नाही. कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या दुर्दशेसाठी केंद्र सरकारला जबाबदार धरले. हा एक निर्णय कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा संसार उद्ध्वस्त करणारा आहे. त्यामुळे कांद्याच्या निर्यातीवरील बंदी उठवली पाहिजे, अशी मागणी शरद पवार यांनी केली. मी मागे मनमाडला आलो होतो, तेव्हा मला काही शेतकऱ्यांनी सांगितले की, कांदा संदर्भात काही निर्णय केंद्र सरकार घेत आहे. त्यामुळे मी कार्यक्रम थांबवून तत्काळ दिल्लीला गेलो. त्यावेळी, भाजपचे लोके कांद्याच्या माळ गळ्यात घालून आले होते. याबाबत अध्यक्षांना विचारल्यावर कांद्याचे भाव खूप वाढल्याचे त्यांनी सांगितले. तसेच कांद्याचे दर कमी करता येणार नाही का? असे मला अध्यक्षांनी विचारले. त्यावर, दोन पैसे शेतकऱ्यांना मिळत असतील तर मिळू द्या असे मी त्यांना सांगितले, असल्याच शरद पवार म्हणाले.

कांदा उत्पादक शेतकऱ्यांना जाहीर केलेले अनुदान अजून दिलेले नाही. हे अनुदान देण्याची प्रक्रिया लवकर राबवा. शेतकऱ्यांना शंभर टक्के कर्जमाफी द्या, अशी मागणी शरद पवार साहेब यांनी केली. तसेच नाशिककरांना शरद जोशी यांच्या आंदोलनाची आठवण करुन दिली. शरद जोशी यांनी नाशिक जिल्ह्यातून शेतकऱ्यांची सामूदायिक शक्ती उभी केली होती. त्यांनी शेतकऱ्यांची ताकद सरकारला दाखवली. तसाच इतिहास आता घडवायचा आहे.

## राज्यातील संकटात असलेल्या शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी जाहीर करा : नाना पटोले



राज्यात शेतकरी, शेतमजूर, कामगार, बेरोजगारांचे प्रश्न मोठे आहेत पण भाजपाचे आंधळे, बहिरे, मुके सरकार त्याकडे लक्ष देत नाही. मख्यमंत्री प्रश्नांना उत्तरे देत नाहीत तर सुपर मुख्यमंत्री उत्तरे देतात. शेतकऱ्यांना भरपूर मदत दिली असे सुपर मुख्यमंत्री म्हणतात पण ही मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहचलीच नाही. सरकारने मदत केली तर मग ती गेली कुठे? राज्यात भिषण पाणीटंचाई आहे, एकीकडे कोरडा दुष्काळ तर दुसरीकडे ओला दुष्काळ पडला आहे. अवकाळी पावसानेही शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. शेतकरी संकटात असल्याने सरकारने शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी दिली पाहिजे, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांच्या नेतृत्वाखाली दिक्षाभूमी ते विधानभवन असा हल्लाबोल मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चात हजारो लोकांनी सहभाग घेतला. यावेळी विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, तेलंगणाचे प्रभारी माणिकराव ठाकरे, माजी केंद्रीय मंत्री विलास मुत्तेमवार, माजी मंत्री सुनिल केदार, डॉ. नितीन राऊत, यशोमती ठाकूर, वर्षा गायकवाड, अमित देशमुख, विधान परिषद गटनेते सतेज बंटी पाटील, माजी मंत्री सुरेश वरपुडकर, माजी मंत्री विश्वजित कदम, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, आमदार प्रणिती शिंदे, बसवराज पाटील, चंद्रकांत हंडोरे, आ. कुणाल पाटील, मुंबई काँग्रेसचे माजी अध्यक्ष आमदार भाई जगताप, अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष आमदार वजाहत मिर्झा, महिला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष संध्या सव्वालाखे, सेवादलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष कुणाल राऊत, एनएसयुआयचे प्रदेशाध्यक्ष आमिर शेख, एससी विभागाचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ हत्तिअंबिरे, आमदार अभिजित वंजारी, आ. सुभाष धोटे, आ. अमित झनक, नागपूर शहराध्यक्ष विकास ठाकरे, नागपूर ग्रामीणचे अध्यक्ष राजेंद्र मुळक, प्रदेश सरचिटणीस देवानंद पवार, प्रमोद मोरे, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, सोशल मिडीया प्रमुख विशाल मुत्तेमवार, मदन जाधव आदी उपस्थित होते.

मोर्चाला संबोधित करताना नाना पटोले पुढे म्हणाले की, भाजपा सरकारच्या काळात राज्यात गुन्हेगारी वाढली आहे. महाराष्ट्र आज गुन्हेगारी, भ्रष्टाचार, दंगली घडवण्यात देशात एक नंबरवर आहे. या सरकारला शेतकऱ्यांचे देणेघेणे नाही, बेरोजगारांची थट्टा चालवली आहे. शिक्षण भरतीचा प्रश्न आहे, जिल्हा परिषदेच्या शाळा बंद केल्या जात आहेत पण सरकार खोटे बोलून जनतेची दिशाभूल करत आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत छत्तिसगड व मध्य प्रदेशला लागून असलेल्या महाराष्ट्राच्या सीमाभागात काँग्रेस पक्षाला मोठे जनसमर्थन मिळालेले आहे. या भागातून ७५ ते १०० टक्के काँग्रेसचे उमेदवार निवडून आले आहेत, महाराष्ट्रातही काँग्रेसची लाट आहे हे लक्षात घ्या.

## कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर महिलेचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेचा प्रश्न अधिक गंभीर झाला असून कुटुंबनियोजन शस्त्रक्रियेनंतर महिलेचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उजेडात आली आहे. साधना संजय जराते ( २३ रा. कारवाफा ) असे मृत महिलेचे नाव असून करवाफा प्राथमिक आरोग्य केंद्रात आयोजित शिबिरात शस्त्रक्रिया करण्यात आली होती. याप्रकरणी मृत महिलेच्या कुटुंबाने दोषींवर कारवाईची मागणी केली आहे. ८ डिसेंबरला कारवाफा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कुटुंब नियोजन शिबीर घेण्यात आले होते. यात मृत साधना जराते यांची कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया करण्यात आली.

!! श्री सखाराम महाराज प्रसन्न !!



संत श्रेष्ठ सखाराम महाराज, लोणी यांच्या 145 व्या पुण्यतिथीनिमित्त महाप्रसादास येणाऱ्या

सर्व भाविक भक्तांचे हार्दिक स्वागत

स्वागतकर्ते

सरपंच ग्रा.पं. मोप | उपसरपंच ग्रा.पं. मोप | सचिव ग्रा.पं. मोप

आणि सर्व ग्रामपंचायत सदस्य व समस्त गावकरी, मंडळी, मोप, ता. रिसोड, जि. वाशिम

!! श्री सखाराम महाराज प्रसन्न !!




संत श्रेष्ठ सखाराम महाराज, लोणी यांच्या 145 व्या पुण्यतिथीनिमित्त महाप्रसादास येणाऱ्या

सर्व भाविक भक्तांचे हार्दिक स्वागत

स्वागतकर्ते

श्री सखाराम महाराज संस्थान लोणी बु. ता. रिसोड, जि. वाशिम





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## आभासी जगातील हिरवळ



आधुनिक केसरी

साहित्य संस्कृती मंच या नावाचा एक व्हाट्सअप समूह आहे. गेल्या महिन्यात म्हणजे २५ आणि २६ नोव्हेंबर या दिवशी या समूहाने माझ्या माहितीप्रमाणे पहिल्यांदाच एक साहित्य संमेलनवजा गेट टुगेदर आयोजित केले होते. या समूहात प्रामुख्याने मध्य प्रदेश, राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र आणि इतरही काही प्रांतातील साहित्यिक आणि साहित्य प्रेमी मंडळी आहेत. मराठी भाषेवरील प्रेम हा या सगळ्यांमधील समान धागा. याच धाग्याने सर्वांना जोडून ठेवले आहे. याच प्रेमामुळे भौगोलिक अंतर कितीही असले तरी आपल्या माणसांसाठी, आपल्या भाषेसाठी सारे एकत्र आले. अनेक वर्षांपासून केवळ व्हाट्सअपवर एकमेकांशी संपर्कात असलेली लेखक, कवी, कथाकार आदी मंडळी या निमित्ताने एकत्र आली. एकमेकांशी प्रत्यक्ष भेटता आले, बोलता आले आणि सहवासाचा आनंद घेता आला. सहभोजनाचा लाभ घेता आला. या आनंदाचे वर्णन शब्दात करता येणार नाही. जळगावच्या जैन हिल्स परिसरात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा परिसर अतिशय निसर्गरम्य आहे. जळगावमधील प्रसिद्ध उद्योगपती पद्मश्री भवरलाल जैन यांच्या संकल्पनेतून या परिसराची निर्मिती झाली. याच परिसरात खरोखरीच एखाद्या तीर्थक्षेत्राचे रूप धारण केलेले गांधीतीर्थ आहे. म. गांधींच्या जीवनावर अभ्यास करण्यासाठी अभ्यासकांना येथे विपुल साधन सामुग्री उपलब्ध आहे. राहण्याची सोय आहे. ही आधुनिक तीर्थक्षेत्रेच आहेत. पालकांनी आवर्जून मुलांना दाखवावीत अशी. आता भवरलालजींचे चिरंजीव  अशोक जैन या सगळ्या गोष्टींवर देखरेख ठेवतात. या परिसरात अनेक सुंदर कार्यक्रमांचे आणि उपक्रमांचे आयोजन केले जाते. या सगळ्या गोष्टींना अशोकजींचा सक्रिय पाठिंबा आणि सहकार्य असते. या कार्यक्रमाच्या उदघाटनासाठी विधानसभेचे माजी अध्यक्ष अरुणभाई गुजराती, अशोकजी जैन, सुप्रसिद्ध हास्य कवी अशोकजी नायगावकर, ज्येष्ठ कवी अरुणजी म्हात्रे आदी दिग्गज मंडळी उपस्थित होती.



## आनंदी पहाट

## अर्थसंचय धनवृद्धीचा राजमार्ग

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्यापैकी अनेकजण भविष्यात काय होईल, याचा विचार करत नाहीत आणि येणारा उद्याचा दिवस चिंतेमध्ये राहून जगतात. वर्तमानाचा पुरेपूर उपयोग करणे महत्त्वाचे आहे, परंतु भविष्याचा आणि आपल्या आर्थिक परिस्थितीचा विचार करणे देखील महत्त्वाचे आहे. जर आपण नियमितपणे बचत करत राहिलो, तर आपल्याला लक्षात येईल, की आपल्या बचतीत सातत्याने भर पडेल आणि रक्कम वाढतच जाईल. पैशाची बचत करण्यासाठी शिस्त लागते, तथापि, दृढ निश्चय आणि ध्येय निश्चित करून, अंगीकारणे ही चांगली सवय आहे; आणीबाणी नेहमीच अनपेक्षितपणे निर्माण होत असते. म्हणून, जेव्हा ती उद्‌भवते तेव्हा आवश्यक निधी सहसा आपल्या नियमित बजेटचा भाग नसतो. औषधोपचार करण्यासाठी होणारा खर्च, घराची दुरुस्ती आणि अगदी कार दुरुस्ती यांसारख्या आर्थिक गरजांसाठी अगदी कमी वेळेत अतिरिक्त निधी शोधण्याचा दबाव असतो. संचित बचत अनेकदा या आणीबाणीच्या परिस्थितींना दूर करण्यासाठी खूप पुढे जाऊ शकते. आता आपली चांगली नोकरी असेल, पण आपण ती नोकरी गमावली तर? अचानक स्वतःसाठी रोजगार शोधणे भयावह आणि क्लेशकारक असू शकते, परंतु हे असे काहीतरी आहे, जे अनेकांना त्यांच्या जीवनात कधीतरी अनुभवायला मिळू शकते. नवीन नोकरी शोधत असताना राहणीमानाचा खर्च भरून काढण्यासाठी बचत ठेवल्यास आपल्याला मनःशांती मिळू शकते. आपण घर किंवा कार विकत घेण्याचा विचार करत असलो मोठ्या रकमेची गरज असते. जीवनातील अनेक मोठ्या घटकांची किंमत खूप जास्त असू शकते. बचतीमध्ये काही रक्कम ठेवल्याने आवश्यक असलेल्या कर्जाची रक्कम मर्यादित ठेवण्यास मदत होऊ शकते. बचतीमुळे तातडीची परिस्थिती उद्‌भवल्यास आपत्कालीन कर्ज घेण्याची गरज टाळण्यास देखील मदत होते, अनेकदा ज्यासाठी उच्च व्याजदर द्यावा लागतो.



आधुनिक केसरी

## विश्वाची माऊली | संजीवन ||

सत्कर्माचे ठायी | भयास न थारा ||
पापाचा निचरा | होत जातो ||१||
संचिताचा पाया | पुण्याचा संचय ||
निष्काम अजय | वर्म जाण ||२||
भुतदया भाव | जागता अंतरी ||
सुखी तो संसारी | सर्वकाळ ||३||
नको प्रतारणा | नको निंदा द्वेष ||
हरिनाम घोष | कर्मासंगे ||४||
संत संगतीने | कर्म शुद्ध होते ||
मौन सिध्द होते | ब्रह्मरूप ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## निरुपण

आधुनिक केसरी

दुःखें घळघळां रडे । जों जों पाहे आंगाकडे ।
तों तों दैन्यवाणें बापुडें । तळमळी जीवीं ॥२५॥
ऐसे कष्ट जाले बहुत । सकळ जालें वाताहात ।
दरवडा घालून वित्त । चोरटीं नेलें ॥२६॥
जालें आरत्र ना परत्र । प्रारब्ध ठाकलें विचित्र ।
आपला आपण मळमूत्र । सेविला दुःखें ॥२७॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

बड़ से बड़ विद्वान जग, सेवाहीन न भाव ।
अधिकारी नहिं भक्ति का, मुक्ति कवन
विधि पाव ।।११।।(स्वर्वेद पंचम मण्डल
पंचम अध्याय) ०५/०५/११
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
जगातील सर्वश्रेष्ठ विद्वान जो सेवाभावहीन आहे, तो भक्तीचा अधिकारी होऊ शकत नाही. म्हणून मग तो मुक्ती कसा मिळवू शकेल ? अर्थात सेवाहीन कोणीही व्यक्ती मुक्तीचा अधिकारी होऊ शकत नाही.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्‌गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## रामदास स्वामी

आधुनिक केसरी

माघ कृ.८ रोजी दोन प्रहरी निद्रा करून उठले, ते समयी वचने दोनी प्रत्येकी येकादशाक्षरे--




देवद्रोहीयांचा नाशची आहे ।। समुद्रातीरस्थांचा नाश आहे ।। बोलिले, असे लेखांक ४३ मध्ये म्हटले आहे. त्यातच शेवटी लिहिले आहे की, नवमी दो प्रहरा दर्शनासी बहुत लोक आले । त्यांस स्वमुखे आज्ञा दिली । ते लोक द्वारापासी उभेच आहेत । संनिध कोन्हासही येऊ दिल्हे नाही । तेच समयी पलंगावरून उतरून पादुकावरी उत्तराभिमुखी बैसले । श्रींचे स्मरण केले ।। "पलंगाखाली उतरले । पादुका पायी लेइले । उत्तर दिशेकडे केले । मुख बरवे ।। भक्तजन विनविती । पलंगावरी बैसावे म्हणती । तेव्हा बोलिले हो प्रीती । बैसाणे नाही ।। तुम्ही बैसवाल तरी पहा । म्हणोन उचलती जन दहा । शक्तिवंत करिती अहा । नुचलती आमुते ।। करिता बहुतची यत्न । नुचले अनुमात्र आसन । तेव्हा आज्ञापिले वचन । बाहेर बैसां ।।

## ठेवतां रामावर एक विश्वास । त्यालाच समाधान हमखास ॥

आधुनिक केसरी

रामाचा हात माझ्यामागें हें ठेवावें मनांत । व्यवहार सांभाळून वागावें जगांत ॥ दुष्ट मतीची उत्पत्ति । ही दुर्जनाची संगति ॥ भावें धरितां रघुपति । सर्व संकटें दूर जाती ॥ भोगांत नामाचें न व्हावें विस्मरण । याकरितां राखावें समाधान ॥ देहाचे भोग देहाचे माथीं । त्याची न मानावी खंती ॥ विश्वास ठेवावा रामापायीं । सर्व कांहीं चांगलें होऊन जाई ॥ आपला भार घेतला रामानें । विश्वासानें सत्य मानणें खरें ॥ सद्‌गुरुआज्ञा प्रमाण । हेंच साधनांतील साधन जाण ॥ जो जो प्रसंग येईल जैसा । तो तो सान्निध्य जाणावें रघुपतीचा ॥ शरीर आहे दों दिवसांचें । वायां न जाऊं द्यावें साचें ॥ रामकृपा त्याजसी होई । ज्यानें नांव ठेवलें हृदयीं ॥ मुखीं नाम, हृदयीं राम । त्यानें जोडला आत्माराम ॥ गुरुचरणीं ठेवावा विश्वास । निर्भयता त्यानें येत खास ॥ जें जें होणार तें होतच जातें । विनाकारण मन कष्टी होतें ॥ माझे प्रपंचीं नाहीं सुखदुःख । असें ज्यानें जाणलें चित्तीं । त्याचा संसार सुखाचा झाला निश्चितीं । ज्यानें दिली रामाची संगति । त्याचा विषाद न मानावा चित्तीं



॥ उद्विग्नतेचें कारण । साधनाचें विस्मरण । मुख्य करितां रामाची भक्ति । आपोआप गळते विषयाची आसक्ति ॥ भगवंतावर ठेवावा पूर्ण विश्वास । तो करतो तेंच हिताचें मानावें खास ॥ अंतकाळीं भगवंताचें नाम । त्याला करीन माझेसमान । हें भगवंताचें वचन जाण । त्याच्यावर ठेवावा विश्वास ॥ म्हणून रामावांचून जगतीं । आतां माझा असें न म्हणावें चित्तीं ॥ दुःख जाण्यास उपाय सांगती साधुजन । आसक्तीत न गुंतावें आपण ॥ म्हणून, सर्व कांहीं करावें । पण मीपणानें कोठें न राहावें ॥ याला उपाय एकच जाण । सदा राखावें रामाचें अनुसंधान । कशांतहि नसावें आपलेपण ॥ परिस्थिति निर्माण झाली । कालांतरानें विलय पावली ॥ म्हणून न मानावें कशाचें सुखदुःख । सर्वांत रामाची जाणीव एक ॥ वाचेनें मौन, हृदयांत रामाचें प्रेम । अखंड रामाचें अनुसंधान । याहून दुजें नाहीं साधन । हें मानावें प्रमाण ॥ ठेवतां रामावर एक विश्वास । त्यालाच समाधान हमखास । म्हणून रामाचा चित्तीं ठेवावा विश्वास । वळण द्यावें व्यवहारास ॥ साधन असें कांहीं असावें । ज्यानें साध्याला सहज पोहोचावें ॥ राम म्हणावा आपला । साधनांतील साधनाचा लाभ झाला ॥ शुद्ध असावें आचरण । पवित्र करावें मन ॥ नामस्मरण ज्याच्या मुखीं । रामकृपें तोच एक सुखी ॥ एकच देव, एकच गुरु, एकच साधन । यांवर ठेवतां विश्वास । कृपा करील ईश्वर खास ॥ **३०४ जेव्हां मनासकट देह केला अर्पण । मग मरणाच्या भयाचे काय कारण ॥**

## गुणरूप

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

हे कोणीही सांगु शकत नाही. तो अनादी अनंत आहे. अनंत -- आत्मा हा अनादी अनंत आहे. तो आत्मानंद आहे तो स्वतः स्वतः मध्ये रममाण झालेला असतो.
*नित्य-- आत्मा हा नित्याचा असतो. तो एक जागा सोडतो तो दुसऱ्या ठिकाणी येतो तेथे तो स्थिर रहातो, परत काही कालावधी नंतर तो दुसऱ्या देहांत जातो म्हणून तो नित्य आहे. तो आहे हे जसे सत्य आहे तसेच आत्मा हा नित्य नवा जन्म घेतो हे देखील सत्य आहे. तो ज्ञानमयी& विज्ञामयी देखील आहे. समस्त तत्वांहून श्रेष्ठ व स्थिर आहे. आत्म्याचे ज्ञान माहिती झाल्यावर म्हणजे आत्मानंद एकरूप झाल्यावर जीवांची जन्ममरणाच्या तावडीतून सुटका होते.

# केशव काळे यांच्या 'होय! हे असंच आहे!', 'मधुशाला' या काव्यसंग्रहाच्या चतुर्थ आवृत्तीचे उत्साहात प्रकाशन






आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** सुप्रसिद्ध कवी व लेखक केशव भवानी काळे लिखित 'होय! हे असंच आहे!' आणि हरिवंशराय बच्चन यांच्या 'मधुशाला' या काव्यसंग्रहाचा केशव भवानी यांनी केलेल्या भावांतराच्या चतुर्थ आवृत्तीचा प्रकाशन सोहळा रविवारी ख्यातनाम चित्रपट निर्माते व चाटे समूहाचे सर्वेसर्वा प्रा. मच्छिंद्र चाटे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. ज्येष्ठ संपादक यमाजी मालकर यांनी यावेळी दोन्ही पुस्तकांवर सविस्तर भाष्य केले. शासकीय विद्यानिकेतनचे सेवानिवृत्त शिक्षक मानसिंग पाटील हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी प्रा. मच्छिंद्र चाटे म्हणाले की, आजची तरुण पिढी फेसबुक, व्हाट्सएप, इंटरनेटच्या मोहजाळात पुरती अडकली आहे. त्यांना या मायाजाळातून बाहेर काढण्याचे काम वाचन संस्कृतीच करेल. "वाचाल तर वाचाल" ही उक्ती तंतोतंत खरी असल्याचा विश्वास प्रा.मच्छिंद्र चाटे यांनी व्यक्त केला.

आपण आपले जीवनातील अनुभव लिहायलाच हवेत. आगामी पिढीला ते दिशा दाखवण्याचे काम करतील. केशव काळे यांनी लिहिलेले त्यांचे अनुभव हे त्यांचे नसून थोड्या फार फरकाने आपणा सर्वांचेच आहेत. हा ठेवा पुढील पिढीसाठी जपून ठेवायला हवा, असे म्हणत सकाळ वृत्तपत्र समूहाचे माजी संपादक यमाजी मालकर यांनी आपल्या खुमासदार शैलीत भाष्य विशद केले.

मौलाना आझाद संशोधन केंद्र, मजनू हिल, छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या या कार्यक्रमाला शहरातील तसेच महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून केशव काळेंवर प्रेम व्यक्त करणारे अनेक मित्र आवर्जून उपस्थित होते.

**आपल्या प्रेमाने मी भारावून गेलो :** माझ्यावर प्रेम करणारे अनेकजण या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित आहेत. विशेषत माझी जन्मभूमी असलेल्या चिकलठाण येथील आलेल्या आप्तस्वकीयांमुळे मला पुन्हा गावात आल्याचा आज भास होत आहे. या आत्मचरित्रात असलेले काही व्यक्तीही येथे उपस्थित आहेत. आपल्या सर्वांच्या प्रेमाने मी भारावून गेलो आहे, असे म्हणत लेखक, कवी केशव काळे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.


# चिमुकल्या अंश देशमुखने पार केले ३७ गडकिल्ले

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**लखमापूर :** दिंडोरी तालुक्यातील लखमापुर येथील अंश अभिमन्यू देशमुख या  अवघ्या तीन वर्षांच्या बालकांने आतापर्यंत जवळजवळ ३७ वेगवेगळ्या स्वरूपांचे गडकिल्ले पायी प्रवास करून पार केल्याने त्यांचे सर्व स्तरातुन कौतुक केले जात आहे.

प्रत्येकांला कोणत्या ना कोणत्या छंद जोपसन्याची हौस असते. परंतु अत्यंत कमी वयात आपला छंद जोपासने म्हणजे एक प्रकारे नवलंच म्हणावे लागले. ही किमया केली आहे. दिंडोरी तालुक्यातील लखमापुर येथील अवघ्या तीन वर्ष असणाऱ्या अंश अभिमन्यू देशमुख या चिमकुल्या बालकाने आता ३७ गडकिल्ले पायी प्रवास करून सर केले आहे. बालपण हे खेळण्या बागडण्यात जाते. परंतु अंश हा ध्येय गाटण्यासाठी खेळाकडे दुर्लक्ष करीत गडकिल्ले याची माहिती घेऊन ते कसे पार करायचे या शोधात असतो. यांचे मार्गदर्शन तो आपले वडील अभिमन्यु देशमुख यांच्याकडून घेत असतो.





अवघ्या वयाची अडीच वर्ष पार केल्यानंतर दिंडोरी तालुक्यातील रामशेज या ऐतिहासिक किल्ल्यापासून आपल्या मोहिमेला प्रारंभ केला. तेव्हा पासून आजपर्यंत जवळजवळ ३७ गडकिल्ले पायी प्रवास करून संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष आपल्याकडे वळुन घेतले. आतापर्यंत सर्वात खडतर व अवघड असे घोडप, मार्कंड्य, शिवनेरी, रायगड, रतनगड, देहरगड, मीरागड, हरगड, भैरवगड (मोरोशी), अलंग, मदन, कुलंग, साल्हेर मुल्हेर डोंगर, हरीहर, तसे अनेक गडकिल्ले अंशने सहज सर केले आहे.

**सुट्टीचा दिवस गडकिल्ले पार करण्यासाठी कारणी :** सुट्टीचा दिवस मुलांना विविध खेळण्यासाठी मिळतो. परंतु अंश देशमुख या चिमकुल्या बालकांला सुट्टीचा दिवस म्हणजे गडकिल्ले पार करण्यासाठी पर्वकाळ समजला जातो. सुट्टीच्या दिवशी आपले वडील किंवा आपल्या परिवारातील कोणाला तरी बरोबर घेऊन गडकिल्ले पार करण्यासाठी निघत असतो. सर्व प्रथम अंशने बालवयात चिखल मातीपासून किल्ले देखावे निर्माण केले होते. तेव्हा पासून अंश व गडकिल्ले यांचे नाते अत्यंत घट्ट बनले. असे त्यांच्या परिवारांकडुन सांगण्यात येते.

महाराष्ट्रांचा पहाडी आवाज असणारे शिवशाहीर बाबासाहेब देशमुख यांच्या शिवरायांच्या पोवाड्यांचा माझ्या मनावर प्रभाव पडल्यामुळे मला गडकिल्ल्यांचे पाहण्याची व पार करण्याची आवड निर्माण झाली. विविध ऐतिहासिक पुस्तकांतील विविध गडकिल्ल्यांचे फोटो माझ्या मनाला भुरळ घालीत होते. तेव्हा वडीलांचे याबद्दल मार्गदर्शन घेऊन विविध गडकिल्ले पार करण्यासाठी सुरू केली. व सर्वाच्या आशिर्वादाने मी खडतर असणारे गडकिल्ल्यांचे भ्रमण केले आहे. मला यामुळे नवीन असंख्य मित्र भेटले. व गड पाहाण्यांचा आनंद प्राप्त झाला. व महाराष्ट्रातील व महाराष्ट्रांबाहेरील अतिशय खडतर व अवघड असणारे गडकिल्ले पार करायचा आपला मानस आहे. असे ही अंशने आपल्या बोंबड्या भाषेत सांगितले.
**कु.अंश अभिमन्यु देशमुख, लखमापुर ता.दिंडोरी.**

गडकिल्ले पार करण्यासाठी तो नेहमी आपला सुट्टीचा दिवस निवडतो. सुट्टीचा दिवस आला आहे की आपल्या परिवारातील कोणांला तरी बरोबर घेऊन तो गडकिल्ले सर निघत असतो. यांच्या त्यांच्यावर जो विचारांचा प्रभाव पडला तो शिवशाहीर बाबासाहेब देशमुख यांचा. त्यांची प्रेरणा घेऊन गड कसे असतात. त्यांचा अभ्यास कसा करावा हेच ध्येय मानुन अंश हा  अनेक खडतर गडकिल्ले सहज पार करून सर्व नागरिकांच्या गळ्यातील ताईत बनला आहे. जे गड पार करण्यासाठी जेव्हा तो जातो तेव्हा तिथे अत्यंत कमी वयात एवढी मोठी ध्येयवादी भावना पाहून अनेक ठिकाणी त्यांचे नवीन नवीन हजारो मित्र परिवार निर्माण झाला आहे. हे विशेष.

# तासगाव तालुक्यात भानामतीचा प्रकार

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** तासगाव तालुक्यात तीन गावचे रस्ते एकत्रित येतात, अशा तिकाटण्यावर भानामती करण्याचा प्रकार सोमवारी उघडकीस आला. सामाजिक कार्यकर्त्यांनी शालेय मुला-मुलींना सोबत घेऊन हा अंधश्रद्धेचा प्रकार असल्याचे सांगत उतारा म्हणून टाकलेल्या वस्तू जाळून टाकल्या. तासगाव तालुक्यातील चिखलगोठण फाट्यावरील निंबळक, बोरगांव तिकाटण्यावरून बोरगाव माध्यमिक शाळेस जाणाऱ्या रस्त्यावर अज्ञातांनी भानामतीचा प्रकार केल्याचे सकाळी उजेडात आले. सूप, दुरडी, लिंबू, नारळ, लवंग, मिरे, काळे कापड आदी वस्तू भानामतीसाठी वापरण्यात आल्या होत्या. या वस्तूंवर हळदी-कुंकू टाकण्यात आले होते. अमावस्या, पौर्णिमा, बुधवार आणि शनिवार या दिवशी प्रामुख्याने या तिकाटण्यावर वारंवार अशा वस्तू नजरेस पडत आहेत. यामुळे यावेळी या प्रकाराबाबत शाळेस जाणाऱ्या मुलामुलींमध्ये अकारण भीती निर्माण होऊ नये यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांनी अंधश्रद्धेवर घाव घालण्याचे ठरवून आज सकाळी शाळेतील मुला-मुलींना सोबत घेऊन या वस्तूंचे सामुहिक दहन करीत या प्रकाराला मूठमाती देण्याचा प्रयत्न केला. या प्रकारांना वेळीच आवर घालून समाजात अंधश्रद्धा निर्माण करणाऱ्यांवर पोलीसांनी कठोर कारवाई करावी, अशी मागणीही सामाजिक कार्यकर्त्यांनी यावेळी केली. शाळेतील शिक्षक पांडूरंग महाडिक, सुंदरनाथ पाटील यांच्यासह किरण निकम, शंकर सोमदे, किरण पाटील, अधिकराव साळुंखे, अनिल पाटील, अक्षय पवार, महादेव पवार यांनी या अंधश्रद्धेला खतपाणी घालणाऱ्या या वस्तू तिकाटण्यावर जाळून नष्ट केल्या.




# न्यायमूर्तींची टिप्पणी

आधुनिक केसरी

गेल्या चार वर्षांपासून कलम ३७० हा राष्ट्रीय स्तरावर चर्चेचा विषय राहिला होता. २०१९मध्ये हे कलम रद्द करून जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा काढून घेण्यात आला. हा निर्णय योग्य की अयोग्य? यावर राजकीय विश्लेषक व राज्यघटनेचे अभ्यासक यांच्यात बरीच चर्चा झाली. या वर्षी या मुद्द्यावर दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सप्टेंबर महिन्यात १६ दिवस सर्वोच्च न्यायालयात सविस्तर सुनावणीदेखील झाली. आज न्यायालयाने कलम ३७० रद्द करण्याचा निर्णय योग्य असल्याचा निकाल दिला. मात्र, त्याचवेळी सर्वोच्च न्यायालयाने जम्मू-काश्मीरमधील स्थिती सुधारण्यासाठी काही सल्ले, शिफारसी व आदेशही दिले आहेत. जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे कलम ३७० हे तात्पुरत्या स्वरुपाचं असून ते रद्द करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय योग्यच असल्याचे शिक्कामोर्तब आज सर्वोच्च न्यायालयाने केले. न्यायालयाने यासंदर्भात याचिकाकर्त्यांच्या सर्व आक्षेपांचा सविस्तर आढावा घेऊन मुद्देसूद निकाल दिला. तसेच, राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्यासाठी राष्ट्रपतींना राज्य विधिमंडळाची शिफारस घेणे बंधनकारक नसल्याचे स्पष्ट करत न्यायालयाने तो आक्षेप फेटाळून लावला. दरम्यान, एकीकडे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी सविस्तर निकाल वाचून दाखवल्यानंतर पाच सदस्यीय खंडपीठातील दुसरे न्यायाधीश कौल यांनी काश्मीरमधील स्थिती सुधारण्यासाठी एक अभिनव संकल्पना मांडली. जम्मू-काश्मीरमधील नागरिकांना गेल्या अनेक दशकांपासून झालेल्या जखमा भरून निघणे सलोख्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्याचे कौल यांनी नमूद केले. तसेच, त्यासाठी सत्य व सलोखा आयोगाची स्थापना करण्याची शिफारस कौल यांनी केली. जम्मू-काश्मीरच्या मुद्द्यावर सुधारणेच्या दिशेने जायचे असेल, तर तिथल्या जनतेच्या मनात झालेल्या जखमा भरून निघणे गरजेचे आहे. तिथल्या वेगवेगळ्या पिढ्यांना मोठे मानसिक आघात सहन करावे लागले आहेत. या जखमा भरून काढण्याच्या दिशेनं टाकण्यात आलेलं पहिलं पाऊल म्हणजे शासकीय किंवा बिगर शासकीय घटकांकडून काश्मीरी जनतेच्या अधिकारांचे झालेले उल्लंघन मान्य करणे, त्याची दखल घेणे. सत्याचा स्वीकार केल्यास त्यातून सलोख्याच्या प्रक्रियेचा मार्ग निघू शकतो, असे त्यांनी नमूद केले. एक तटस्थ सत्य व सलोखा समितीची स्थापना करण्यात यावी. या समितीमार्फत शासकीय व बिगरशासकीय घटकांकडून किमान १९८०च्या दशकापासून काश्मीरमध्ये मानवी हक्कांच्या झालेल्या उल्लंघनाची चौकशी केली जावी. याचा अहवाल सादर करून सलोखा प्रस्थापित करण्यासाठी शिफारशी करण्यात याव्यात, असे न्यायमूर्ती कौल यांनी नमूद केले. या जखमांच्या आठवणी अस्पष्ट होण्याआधी ही समिती स्थापन केली जावी. ही सर्व प्रक्रिया पूर्वनियोजित वेळेमध्येच पार पाडली जावी. काश्मीरमध्ये एक आख्खी तरुण पिढी अविश्वासाची भावना मनात बाळगून मोठी झाली आहे. त्यांना यातून स्वातंत्र्याचा दिवस जगता यावा यासाठी आपण बांधील आहोत, असे म्हणत कौल यांनी काश्मीरमधील सद्य स्थितीवरही टिप्पणी केली.

# ईव्हीएमचा घोळ, कमळाला बळ



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**ईव्हिएम जेव्हा पासून निवडणूक प्रक्रीयेत आली तेव्हा पासून प्रत्येक निवडणुकीत ईव्हिएम वर प्रश्न चिन्ह उपस्थित झाले आहे. लोकशाही मध्ये लोकांचे सरकार स्थापन करण्यासाठी सर्वात मोठे शस्त्र म्हणजे मताधिकार होय. मताधिकाराच्या जोरावर देशात सत्ता बनू शकते त्याच मताधिकाराच्या जोरावर सत्ता बदलू शकते. लोकांना लोकांच्या मतानुसार उमेदवार निवडून स्वतः च्या व सामाजिक समस्या सोडवण्यासाठी तसेच सरकारने ने जनकल्याणाचे धोरण आखूण सर्वांगीण विकास करण्यासाठी मताधिकार सर्वात महत्वाची भुमिका पार पाडत असते. कारण एक मत सत्तेत बदल घडवून आणु शकतो.**

परंतु ईव्हिएम आली आणि लोकांचा मताधिकार हिसकावून घेऊन लोकशाहीची हत्याच झाली असे म्हणणे वावगे ठरणार नाही. कारण ईव्हिएम च्या माध्यमातून मताची हेराफेरी करून प्रत्येक निवडणूक होत आहे व सत्ता स्थापन करत आहेत. निवडणूक केवळ औपचारिक झाली असून देशात कोणाची सत्ता असेल, जनतेचे प्रतिनिधी कोण असेल हे लोक नाही तर ईव्हिएम ठरवत आहे. निवडणूक केवळ औपचारिक झाल्याने व लोकांच्या मताची किंमत शुन्य झाल्याने लोक कल्याणाची कामे करण्याची गरज राजकीय पक्षांना वाटत नाही. मग तो राजकीय पक्ष सत्तेत असो वा विरोधात असो. म्हणुनच लोकांच्या समस्या वाढत जात आहेत तर उद्योगपती व खाजगी लोकांच्या हातात देशातील सर्व सत्ता एकवटत आहे. ही खुप गंभीर बाब आहे. ईव्हिएम हे इलेक्ट्रॉनिक डिव्हाईस असल्याने ते पुर्णपणे सुरक्षित आहे म्हणणे म्हणजे केवळ अज्ञान दाखवणे होय. दुसरी गोष्ट शैक्षणिक दृष्टीने प्रगत व वैज्ञानिक दृष्टिकोन असलेल्या आणि स्वतः ईव्हिएम बनवलेल्या देशात निवडणूक प्रक्रियेत ईव्हिएम वापरली जात नाही. कारण ईव्हिएम मध्ये अनेक प्रकारचे घोळ करता येतात. आज पर्यंत ईव्हिएम घोळाचे अनेक प्रकरणे समोर आले आहेत. २००९ च्या निवडणुकीत कॉंग्रेस ने ईव्हिएम मध्ये घोळ करून निवडणूक जिंकली असा आरोप करून कॉंग्रेस ला मताची चोरी करणारा पक्ष म्हणून कमळाच्या जेष्ठ नेत्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. म्हणजे २००९ च्या निवडणुकीत ईव्हिएम मध्ये घोळ होऊ शकतो हे कमळावाल्यांनीच मान्य केले. लोकांना त्याबद्दल जागृती व फारशी माहिती नव्हती. परंतु नंतरच्या काळात तंत्रज्ञानाचा वाढता वापर, तंत्रज्ञाना बद्दल जागृती झाल्याने लोकांना इलेक्ट्रॉनिक्स डिव्हाईस व तंत्रज्ञानाची चांगली माहिती झाली आणि सोशल मिडीयाच्या माध्यमातून ती सर्वत्र प्रसारित व्हायला सुरुवात झाली. २०१४ पासून इव्हिएमच्या कमळाशी संबधीत उमेदवारांच्या खाजगी गाडी मध्ये, इव्हिएम कमळाशी संबधीत लोकांच्या घरांमध्ये सापडायला लागल्या. निवडणूक आयोगाचे काम असते निवडणूक प्रक्रीया हि विश्वसनीय व पारदर्शक व्हायला पाहिजे. परंतु निवडणूक आयोगाच्या ईव्हिएमच कमळासोबत असतील तर निवडणूक विश्वसनीय व पारदर्शक कशी होणार ? कोणतेही बटण दाबले तर कमळालाच मत जाते हा घोळही करून कमळाला बळ दिले जाते. आजपर्यंत इव्हिएम बिघाडाच्या बाबी कमी आणि जुगाडाच्या बाबी जास्त समोर आल्या आहेत. निवडणूक प्रक्रिया सुरू असताना असताना इव्हिएम मध्ये बिघाड होऊन निवडणूक थांबवण्याची वेळ अपवादात्मक आली असेल. पण प्रत्येक निवडणूकीत घोळ होतो हे आता कोणीही सांगत आहे. ईव्हिएम चोरीला जाणे, इव्हिएम हरवण्या सारखे बेजबाबदार कामे येथे केल्या गेले. २०१४ नंतर जे काही घोळ उघड झाले ते सर्वच्या सर्व कमळाशी संबधीत आहेत. आज लोकांचा इव्हिएम वर विश्वास राहला नाही, सोशल मिडिया व प्रत्यक्ष लोकांच्या मनात कमळाबद्दल आपुलकी, प्रेम तर दिसत नाही. परंतु कमळाच्या माध्यमातून प्रत्येक नागरिक किती त्रस्त आहे याची जाणीव होते. कमळाच्या सभेला प्रतिसाद मिळत नाही, कमळाच्या उमेदवारांना गावातून काढून दिले जाते, कमळाच्या उमेदवारांना कॅमेरा समोर मारले जाते. अर्थात उमेदवारांना गावातून काढून देणे, वा प्रचारासाठी आलेल्या उमेदवारांना मारणे, त्यांचा अवमान करणे याचे मी वैयक्तिक समर्थन करत नाही. परंतु जनता कमळाच्या विरोधात असताना इव्हिएम मध्ये कमळाला मत जातात कसे ? हा संशोधनाचा विषय आहे. अनेक वेळा कमळाशी संबधीत लोकांनी स्वतः च ईव्हिएम चे बटण दाबून लोकांना मताधिकारापासुन दुर ठेवले, कमळाच्या लोकांनी सर्वसामान्य लोकांवर कमळाचे बटण दाबण्यासाठी दबाव आणला, सर्व सामान्य जनतेला धमकावले, मारले अशा अनेक घटना सोशल मिडिया वर व्हायरल होत असताना जनाधार कमळाच्या विरोधात असताना इव्हिएम मध्ये कमळाला मते येतात कोठून ? सत्तेचा गैरवापर करून अनेक वेळा स्ट्रॉगरुम मध्ये कमळाचे लोक इव्हिएम सोबत छेडछाड करतानाच्या बातम्या समोर आलेल्या आहेत. आताच झालेल्या निवडणुकी मध्ये स्ट्रॉगरुम च्या बाहेर सिसिटीव्ही कॅमेऱ्यावर लक्ष ठेवून इव्हिएमची सुरक्षा सर्वसामान्य लोकांनी केली. ती सुरक्षा करताना स्ट्रॉगरुम मध्ये लावलेले सर्व सिसिटीव्ही कॅमेरे एकाच वेळी सर्वच्या सर्व एका तासासाठी बंद होतात एका तासानंतर पुन्हा सर्वच्या सर्व सुरू होतात. हे लक्षण कशाचे आहे ?जर स्ट्रॉगरुम मध्ये लावलेल्या सिसिटीव्ही कॅमेरे एकाच वेळी बंद चालु होऊ शकतात तर इव्हिएम मध्ये एकाच वेळी घोळ कशावरून झाला नसेल ? सर्वात सुरक्षित तंत्रज्ञान बँकिंग क्षेत्रात असते तेथेही फ्रॉड होऊन लोकांचे हजारो करोडो रुपये आजपर्यंत गायब झालेले आहेत. केवळ एखाद्या लिंकवर क्लिक केल्याने बँकखाते रिकामे होऊ शकते तर ईव्हिएम चा ताबा कमळाकडेच आहे. म्हणून घोळ घोणे साहजिकच आहे. अनेक राजकीय नेते व पक्षांनी इव्हिएम सुरक्षित नसल्याने आवाज उठवला आहे. सर्व जन इव्हिएमला विरोध करत असताना कमळाचे लोक इव्हिएमची बाजु का घेत असतील बरं ? इव्हिएम कळमाचा कार्यकर्ता, पदाधिकारी आहे का ? कमळाचा आणि इव्हिएमचा काय संबंध ? जर संबंध नसेल तर सर्व जन म्हणतात इव्हिएमवर विश्वास नाही तर कमळावाले पेपरवर निवडणूक घेण्यासाठी का तयार होत नाहीत ? तुम्ही बटण कोणतेही दाबा निवडून आम्हीच येणार असे कमळावाले उघडपणे बोलुनही इव्हिएम बंद का होत नसेल ? वरील प्रश्न डोक्यात आले तर उत्तर एकच मिळते कमळाचे अस्तित्व लोकांच्या मतावर नाही तर इव्हिएम वर अवलंबून आहे. जर लोकांच्या मतावर अवलंबून असते. कमळाला इव्हिएमचा आधार का घ्यावा लागतो ? इव्हिएम मध्ये घोळ करूनही मनाची शांती न झालेल्या कमळाच्या लोकांनी बॅलेट पेपर ची पेटी फोडून मताची हेराफेरी केल्याचेही व्हिडीओ व्हायरल झाले आहेत. इव्हिएम विजयाचा कौल कमळाला देताना बॅलेट पेपरवर झालेल्या मताचा कौल कमळाकडे नसतो. मग इव्हिएम मधुनच मताचा कौल कमळाला कसा मिळतो ? कमळावाले मोठ्या मनाचे व लोकशाही ची जाण असणारे व लोकांच्या मताची कदर करणारे असतील तर सरकारने दबाव आणलेल्या मिडियाचे मत न बघता एकदा सोशल मिडिया वर सर्वसामान्य लोकांचे मत बघुन त्यांचा व लोकशाही चा आदर करून इव्हिएमवर निवडणूक घेणे बंद करून स्वतः च्या कामाच्या व विकासाच्या जोरावर पेपरवर निवडणूक घेऊन विजयी होऊन लोकांना लोकशाहीची जाणीव करून द्यावी. परंतु कमळावाले इव्हिएमच्या विरोधात बोलत नाहीत. इव्हिएम घोळाचे आरोप सर्व कमळावर असुनही कमळावर निवडणूक आयोग कारवाई करत नाही. उलट निवडणूक आयोगच स्वतः ला कमळाचा भाग समजतो म्हणून निवडणूक आयोगाच्या इव्हिएम कमळाच्या उमेदवारांकडे आढळून येतात. एवढ्या मोठ्या प्रमाणावर लोकांच्या मताची हेराफेरी करून लोकशाहीची हत्या केली जाते, भांडवलशाही ला जगवले जाते. याला केवळ इव्हिएम कारणीभुत आहे हेच दिसून येते. लोकशाही वाचवायची असेल तर ईव्हिएम बंद होणे आवश्यक आहे. जनतेचा इव्हिएमवर विश्वास नसेल तर निवडणूक आयोग इव्हिएम बंद का करत नाही ? ईव्हिएम सर्वांना थोड थोड देऊन राजकीय पक्षांना शांत करून लोकशाहीची हत्या करत आहे. कोणी दोन चार पाच जागा निवडून आल्या म्हणून खुश होत आहे तर कोणी मताची टक्केवारी वाढली म्हणून खुश होत आहे, काही ठिकाणी कमळ स्वतः थोड्याफार फरकाने सत्ता दुसऱ्याला ही देत आहे म्हणजे इव्हिएम विरोधात कोणी उभे राहणार नाही. कमळाचा मिडिया लोकांचा इव्हिएम वर विश्वास बसावा म्हणून इव्हिएम मध्ये मताची चोरी झाली असती आणि कमळच जिंकले असते तर त्या ठिकाणी कमळ का नाही निवडून आले अश्या पद्धतीने मत व्यक्त करून कमळाप्रती असलेली गुलामीची श्रद्धा व्यक्त करून वैचारिक दिवाळखोरी करणाऱ्यांची संख्या कमी नाही. म्हणून इव्हिएम कमळाला बळ देत असेल तरीही देशाला व लोकशाहीला नेस्तनाबूत करत आहे. देशात लोकशाही टिकवायची असेल आणि जनकल्याणाचे कामे करायचे असतील तर इव्हिएमला विरोध करून सर्वसामान्य जागृत मानसाने रस्त्यावर येणे आवश्यक आहे. नाहीतर इव्हिएमच्या माध्यमातून आधुनिक गुलामी आपल्या समोर उभी आहे. जनता गरिब झाली आहे परंतु राजकीय पक्षाकडे करोडो रुपयांची संपती आहे, राजकीय नेते व त्यांचे मुल काहीच काम करत नाहीत तरीही ते करोडपती आहेत. सर्वसामान्य जनतेला एकवेळ खाण्याची चिंता आहे. दिवे लावण्याचा विक्रम करणाऱ्यां देशात त्याच दिव्यातील तेल बाटलीत भरून त्या तेलाचा वापर खाण्यासाठी करणारे व दिव्यातील तेल मिळावे म्हणून संघर्ष करणारे लोक याच देशात आहेत. समस्या केवळ सर्वसामान्य लोकांना आहेत. राजकीय पक्ष राजकीय नेते यांना कोणत्याही समस्या नाहीत. सर्व सामान्य लोकांकडे शाळेची फी भरायला पैसे नाहीत नेत्यांची मुल विदेशात शिकुन येतात. ही गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे. आणि हे सर्व बदलायचे असेल तर एकच शस्त्र आहे आणि ते म्हणजे मताधिकार. याच मताधिकाराला वाचवण्यासाठी इव्हिएम विरोधात मोठे आंदोलन उभे राहणे आवश्यक आहे. तरच लोकशाही टिकेल. नाहीतर इव्हिएम कमळाला बळ देते. आणि येणाऱ्या काळात देश व जनता पुन्हा गुलामीत जाते.



# अहंकाराचा वारा लागला तर आत्मबळ सिद्धीस जात नाही



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**आत्मविश्वास हि जीवनातील सगळ्यात मोठी सिद्धी असुन जीवनातील खुप मोठी सकारात्मक उर्जा आहे. आत्मविश्वास जागृत असणं हि सगळ्यात मोठी उपलब्धी असते.हाच आत्मविश्वास आपल्याला यशाच्या शिखरावर घेऊन जातो.पण आत्मविश्वासाला जर अंहकाराचा वारा लागला तर मग मात्र यशाचं अपयशात कधी रूपांतर होत ते कळत देखील नाही.किंवा अगदी अगदी हाकेच्या अंतरावर आलेल यश सुद्धा निसटून जात .म्हणून जीवनात आत्मविश्वास हा सदैव असला पाहिजे परंतु त्याच रूपांतर हे फाजिल आत्मविश्वासात होऊ नये किंवा त्याला अंहाकाराचा वारा लागु देऊ नये. हाच जीवनातील यशाचा महत्वपूर्ण मंत्र आहे.**

सृष्टी वरील प्रत्येक जीव प्राणी यांना विविध घटना क्रमावर, घडामोडीसह दैनंदिन जीवनात निर्माण होणाऱ्या विविध, समस्यांवर, वादळांवर, नैसर्गिक, अनैसर्गिक संकाटावर यथा योग्य मार्ग काढण्यासाठी तसेच जीवनपथ यशस्वी पणे पुर्ण करण्यासाठी आत्मविश्वास हा अंत्यत महत्त्वपूर्ण व आवश्यक आहे.आत्मविश्वासा सारखी दुसरी अदभुत अद्वितीय , बलशाली शक्ति नाही.आपल्या जीवनातील सगळ्यात मोठं बलस्थान हे आत्मविश्वासच आहे.परंतु याच आत्मविश्वासाला जर अंहकाराची झालर लागली तर मग मात्र त्याच फाजिल आत्मविश्वासा मध्ये रूपांतर झाल्याशिवाय राहणार नाही . व आपण मग किती हि बालशाली,सामर्थ्यवान दिग्गज महा दिग्गज परम प्रतापी व्यक्ती असलो.तरी सुद्धा आपल्या अगदी टप्यात दृष्टिक्षेपात आलेलं यश देखिल आपल्या पासून दूर जात. आणि क्षणातच होत्याचं नव्हतं होत .परिणाम स्वरूप आपल्यालवर मनोमन पश्चात्ताप करण्याची वेळ उद्भवते.म्हणून जीवनात आत्मविश्वास असलाच पाहिजे या मध्ये दुमत नाही परंतु तो आत्मविश्वास फाजिल नसला पाहिजे .हे हि तितकच खर आहे .आपण एक गोष्ट जाणुन आहेत जीवनाच्या एखाद्या टप्यावर वळणावर आपल्याला एखाद्या मोठ यश मिळालं तर त्या यशा बद्दल गर्व,अंहाकार, अभिमान न बाळगता आत्मविश्वासा ठेवून प्रयत्न केले तर मिळालेल्या यशापेक्षाही मोठं यश आपण नक्कीच संपादन करू शकतो. आणि जर हाच आत्मविश्वासा फजिल मध्ये रूपांतरित झाला तर मग मात्र आपणं आपल्यला मिळालेल्या यशापेक्षाही मागे जाणार हे निश्चित आहे .एकंदरीत आपल्या प्रगतीच मुल्यमापन हे आत्मविश्वासवर अवलंबून असतं परंतु तो आत्मविश्वास हा फाजिल नसला पाहिजे. फजिल आत्मविश्वासा हा दिग्गजांना सुद्धा नडतो.दिग्गज पराक्रमी परम प्रतापी महाधुरंधर सर्वगुणसंपन्न व्यक्ती सुद्धा सर्व शक्तिशाली असताना देखिल फक्त फजिल आत्मविश्वासवरच पराभुत होऊ शकतो .त्या तुलनेत आपण तर खुपच सामन्यातील सामन्या आहोत. मातीत अर्थ हाच आहे की फजिल आत्मविश्वासवर दिग्गज पराक्रमी सुद्धा पराभुत होऊ शकतो.किंवा महान असा चाणक्य सुद्धा फसु शकतो मग आपण तिथे काय शक्यतो परम प्रतापी महाधुरंधर हे कधीच आपल्या शक्तिवर ,सामर्थ्या गर्व करत नाहीत अंहाकर बाळगत नाहीत उलटपक्षी ते सतत चोवीस तास जागृत सजग , आणि आपल्या धेय्या प्रति लक्ष्य केंद्रीत करून असतात.एतकिंचित सुद्धा चुक होणार नाही याची सदैव दक्षता घेणारे चाणक्ष कधीच आत्मविश्वासाला फजिल आत्मविश्वासा मध्ये रूपांतरित होऊ देत नाहीत.आपण केलेल्या कार्य बदल ते स्वतः ची स्तुती करत नाहीत किंवा इतरांनी स्तुती केली तर हुराळुन जाऊन चुक करत नाहीत ते दिग्विजयी ठरत असतात या उलट आपण एखाद्य सर्व साधारण कार्य जरी केले तरी ते मी केले मी केले असा किती कल्ला करतो गवगवा करतो किंवा लोकांना आपण केलेल एखाद्य छोटं मोठ कार्य दाखविण्यासाठी किती प्रयत्नशील असतो. म्हणजे काय तर दिग्विजयी हा मुळात अंहकार शुन्य असतो.अंहकार आला कि दिग्विजय टिकत नाही हा इतिहास आहे.आपल्या जीवनाच्या वाटेवर मार्गक्रमण करत असताना यशाची मालिका अंखडित चालू ठेवण्यासाठी आत्मविश्वास आत्मबळ खुप आवश्यक आहे.परंतु आत्मविश्वास सार्थ आणि यशस्वी होण्यासाठी अंहकार शुन्य झाला पाहिजे. म्हणजे फजिल आत्मविश्वास नडला नाही पाहिजे.आपण यशस्वी झालो पाहिजे हि अपेक्षा गैर नाही अयोग्य नाही.परंतु आपण यशस्वी होत असताना इतरांना तुच्छ लेखन इतरांना दुय्यम समजून वागणुक देणं म्हणजे अंहकार उत्पन्न होण्यासा सुरवात होण . सगळ्यात महत्वाचे म्हणजे अंहकारा शिवाय असणार आत्मविश्वास यशोशिखरावर घेऊन जातो .आणि अंहाकार युक्त आत्मविश्वास हा फजिल आत्मविश्वास म्हणून गणला जातो व तो आपल्याला यशेशिखारावरून खाली उडी मारण्यासाठी प्रवृत्त करतो . तसेच फजिल आत्मविश्वास हा एकंदरीत आपल्या जीवनातील प्रगती मध्ये अपायकारक अहितकारक सिद्ध होतो. म्हणून जीवनात आपल्याला फक्त फजिल आत्मविश्वासच नडतो.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# देव माझा सखाराम, श्रीक्षेत्र लोणी..!

आधुनिक केसरी

**विदर्भ - मराठवाड्याच्या सीमेवर जगप्रपीद लोणार सरोवरा जवळ असलेले वाशीम जिल्ल्यातील एक गांव लोणी. श्री सखाराम महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेली लोणी संपुर्ण महाराष्ट्रात सखाराम महाराजांची लोणी म्हणून ओळखली जाते. श्री. सखाराम महाराजीचा जन्म मराठवाड्यानीक परभणी जिल्हयातील तळणी येथे डि-9 एप्रील 1786 रोजी रामनवमीला झाला. त्यांनी लोणी येथे कार्तीक वद्य चतुदशीला दि 23 नाव्हेंबर 1878 रोजी समाधी घेतली. तेव्हापासून त्यांच्या पुण्यतिथीला लोणी येथे यात्रा भरते ही यात्रा लोणी यात्रा म्हणून प्रसिद्ध आहे.**

बालपणा पासुनच सखाराम महाराज ईश्वर भक्तीमध्ये रमत आले, सकाळी उठुन गायीचे दर्शन, देवीचे ध्यान, गणपतीचे पुजन अर्चन, याचा त्यांना ध्यास होता. वयाच्या सातव्या वर्षी शके 1715 माघ कृ.पंचमी दि 22 फेब्रुवारी 1794 रोजी त्यांचा व्रतबंध विधी झाला.त्याचवर्षी वेदशास्त्राचे अध्ययन करण्यासाठी वाशीम येथील पंडीत बाळशास्त्री यांचेकडे त्यांना ठेवण्यात आले. त्यांनी 160 श्लोकांचा मुहुर्तमार्तंड हा ग्रंथ एकाच दिवसान मुखोद्गगत केला, त्यांची कुशाग्र बुद्धी पाहुन बाळशास्त्री स्मित झाले.त्यांचा विरोध आसतांनी देखील दि-21 डिसेंबर 1800 रोजी त्यांचा विवाह तळणी येथील आप्पा वायकर यांची मुलगी सरस्वती यांच्याशी लावून देण्यात आला. पण त्याच दिवशी ने गृहत्याग करून तपश्चर्येसाठी निघुन गेले. त्यांनी वाशीम येथील पद्मतीर्थ तलाव, रिसोड येथील पिंगलाक्षीदेवी, लोणार येथील कमळजादेवी-जवळ तपसाधना केली. त्यानंतर


श्री. सखाराम महाराज लोणी जि. वाशिम

ने काशीला गेले. तेथे गंगेच्या काठावर जलस्तंभ योगाद्वारे14 वर्षे तपसाधना केली. त्या नंतर लोणी येथे आले. महाराजांचे दर्शनाने सर्व संकटे दूर होतात, अशी भावीकांची भावना आहे. आपली संकटे सांगण्यासाठी म्हणजे दर्शनना निमित्त भावीक येथे येतात.लोणी यात्रेचे हे 145 वर्ष आहे. यात्रे मध्ये तीन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. कार्तिक वद्य 14 ते मार्गशिर्ष शु.प्रतिपदा म्हणजे 11 डिसेंबर 2023 'श्री'चे श्राध्द दि.12 डिसेंबर 2023 गुरूवार 'श्री' ची पुण्यतिथी व महापंगत,दि.13 डिसेंबर 2023 शुक्रवार ला रथोत्सव व रात्री श्री सखाराम महाराजांचा पालखी सोहळा या कार्येक्रमाचे आयोजन करण्यात येते. मंदीरा समोरील मैदाणा मध्ये सर्व जाती धर्माचे लोक महाप्रसादाचा लाभ घेतात. ज्या ठाकाणी महाराजांनी अन्न शिजविले त्या ठिकाणी महाप्रसाद करण्यात येतो.स्वयंपाका साठी पिढ्यान पिढ्या पासुन नवसेकरी येता. रात्रंदिवस स्वयंपाक करण्यात येतो.पुरी,शिरा व भाजीचा प्रसाद झाल्यावर त्यावर श्रींचा अंगारा व तिर्थ शिंडण्यात येते.व त्यानंतर महाप्रसादाचे भावीकांना वितरण करण्यात येते.महाप्रसाच्या पुरीला अनन्य साधारण महत्व आहे.ही पुरी शेतकरी घरातील धान्यांच्या कोठारा मध्ये ठेवता. यामुळे धान्याला बरकत येते आशा प्रकारचा भावीकांचा समज आहे.13 डिसेंबर ला 'श्री'चा रथोत्सव आहे.तीन मजली लाकडी रथाला बारा खांब असुन त्यावर सुरेख कोरीव काम केलेले आहे. रथामध्ये 'श्री'चा मुखवटा सजवुन ठेवतात. भक्त हाताने रथ ओढतात. रात्री गावा मधुन 'श्री' ची पालखी निघते. मुख्य उत्सव तीन दिवस असला तरी यात्रा सुमारे तीन आठवड्या पर्यंत चालते. यामध्ये विविध दुकाणे, सिनेमा टॉकीज, लोकनाट्य, हॉटिल ईत्यादीची रेलचेल आसते. विदर्भ मराठवाड्यातून भक्त यात्रेला येतात. नवसाला पावनारे देवस्थान म्हणुन येथिल ओळख कायम अखंड अन्नदान हे संस्थानचे व्रत आहे. दर्शनासाठी येणाऱ्या भावीकांना मोफत भोजन व


जयंत वसमतकर
समर्थनगर, रिसोड
जि. वाशिम

निवास व्यवस्था करण्यात येते. भक्तनिवासाचे काम पुर्ण झाले आहे.काळाची गरज ओळखुन संस्थान च्या वतीने इंग्लीश स्कूल सुरू करण्यात आली आहे. सामाजीक जाणीव ठेवून गरीब विदयार्थ्यांना शिक्षण देणे निवास व भोजनाची व्यवस्था विनामुल्य पंस्थानने केली आहे. दरवषी आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यान श्री सखाराम महाराज गोरक्षप प्रनिष्ठान मध्ये 125 गायींचे संगोपन केले जाते.



# 31 डिसेंबरपूर्वी करू किंवा मरू पण विदर्भ राज्य मिळवून राहू

## अॅड. वामनराव चटप

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** विदर्भ राज्याच्या मागणीसाठी विदर्भ राज्य आंदोलन समिती आता अंतीम टप्प्यातील आंदोलन करीत असून 31 डिसेंबर 2023 पुर्वी करू किंवा मरू पण विदर्भ राज्य मिळवून राहू अशी भुमिका विदर्भ राज्य आंदोलन समितीचे अध्यक्ष अॅड. वामनराव चटप यांनी आज स्थानिक पत्रकार परिषदेत व्यक्त केली. या पत्रकार परिषदेस माजी आमदार वामनराव चटप यांच्यासह जिल्हाध्यक्ष किशोर दहेकर, यु.आ.पुर्व विदर्भ अध्यक्ष कपिल ईद्दे, जिल्हा सचिव अंकुश वाघमारे व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

११८ वर्षांपासून स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी करण्यात येत असून अजूनही ही मागणी पुर्ण न झाल्याने आता पुन्हा अंतीम लढाई लढत १४ डिसेंबर, २०२३ पासून विदर्भात रास्ता रोको , आमरण उपोषण आणि संकल्प मेळावा अशा तीन तिन आंदोलनाची मालीकाच विदर्भ राज्य आंदोलन समितीने केली आहे. १४ डिसेंबर, २०२३ ला महाराष्ट्र - छत्तीसगड सीमेवरील गडचिरोली जिल्ह्यातील कोरची तालुक्यातील बोटेकसा या गावाजवळील रस्त्यावर रास्ता रोको आंदोलन केले जाणार आहे. अकोला येथे २० डिसेंबर २०२३ ला पश्चिम विदर्भाचा विदर्भ निर्माण संकल्प मेळावा तर २७ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजेपासून नागपूर येथिल संविधान चौकात आमरण उपोषणाला सुरुवात करण्यात येणार आहे. या आमरण उपोषणाला विदर्भ राज्य आंदोलन समितीचे अध्यक्ष अॅड. वामनराव चटप, संपादक प्रकाश पोहरे , महिला आघाडी अध्यक्ष रंजना मामर्डे, अरुण केदार, यांच्यासह समितीचे पदाधिकारी सहभागी होणार आहेत. याच दिवशी विदर्भातील सर्व ११ जिल्ह्यात रास्ता रोको आंदोलनही करण्यात येणार असल्याची माहिती अॅड. वामनराव चटप यांनी पत्रकार परिषदेत दिली.

# हयातुत सहाबाचे वाचन, दुआने इज्तेमाची सांगता

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे दरेगाव येथे दि.७ रोजी आयोजित इज्तेमाची सांगता हयातुत सहाबाचे वाचन व दुआने करण्यात आली. तालुक्यातील दरेगाव येथे सावंगी सेंटरच्या इज्तेमाचे आयोजन करण्यात आले होते.खुलताबादशहर तथा तालुक्यातील कसाबखेडा,वेरुळ,टाकळी राजेराय, लोणी, बाजार सावंगी सात सेंटर अंतर्गत ठिकठिकाणी एक ते सात इज्तेमाचे आयोजन करण्यात येतात यात दि.७रोजी दरेगाव येथे नमाजे असर ते इशा दरम्यान इज्तेमा ठेवण्यात आला होता. इज्तेमात महिन्या भरात सेंटर तथा मस्जिदवार केलेले काम कार्याचा लेखाजोखा घेण्यात आले.मस्जीदवार हजेरी,कारगुजारी, उमुमी बात व ह्यातुत सहाबाचे वाचन व दुआने इज्तेमाचा समारोप करण्यात आला.उमुमीबात मधे इमान नमाज इल्म जिक्र इक्राम इखलास दावत हज जन्नत दोजख कब्र सह दैनंदिन जीवन तथा सहाबी नबी यांनी केलेले कार्य जीवन यावर सविस्तर मार्गदर्शन यावेळी करण्यात आले.यावेळी सात सेंटरचे मुस्लिम नागरिक उपस्थित होते.

# देवळगाव गुजरी आठवडे बाजारामुळे एसटी बस बंद; ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी झाले त्रस्त

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील मंगळवार दिवशी एसटी गावात येत नसल्याने शाळेत जाणारे विद्यार्थी व जेष्ठ नागरिक, महिला हे त्रस्त झाले आहेत. देवळगाव गुजरी आठवडे बाजार सुरू करण्यात आल्याने त्याचा परिणाम एसटी बस वाहतुकीवर झाला आहे.हा बाजार मेण रस्ता सोडून थोडे दुकाणी मागे घेण्यात यावे अशी मागणी वंचित बहूजन आघाडीचे तालुका अध्यक्ष मनोहर जगताप यांनी देवळगाव गुजरी ग्रामपंचायत कार्यालयाचे ग्रामसेवक व सरपंच यांच्या कडे लेखी निवेदनाद्वारे दि.२८/१०/२३ रोजी केली आहे.
आठवडे बाजार सुरू करण्यात आल्याने त्याचा परिणाम एसटी बस मंगळवारी बंद असते ती देवळगाव गुजरी हून रस्ता नसल्याने माघारी जात आहे.आता सध्या तरी शासनाने लाखो रुपये खर्च करून रस्ता मोठा केला आहे.मात्र रहदारी जास्त असल्याने बस माघारी फिरत यामुळे जेष्ठ नागरिक, महिला व विद्यार्थी यांचे नुकसान होत आहे.
सोयगाव आगार प्रमुख विजय काळवणे यांच्याकडे पत्र दिले आहे की मंगळवारी बस घाणेगाव तांडा,नादां



तांडा,डाभा,देव्हारी, टिटवी, पिंपळवाडी व सावळदबारा एवढ्या नागरिकांचे नुकसान होत आहे. असे लेखी निवेदनाद्वारे कळविण्यात आले आहे.
एसटी महामंडळाने याविषयी देवळगाव गुजरी ग्रामपंचायत कार्यालयाशी पत्रव्यवहार केला आहे, मात्र त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. दुपारच्या सुमारास या बाजारात गर्दी होते, सायंकाळी उशिरापर्यंत हा बाजार सुरू राहत असल्याने पंचक्रोशीतील लोक सावळदबारा येत असताना प्रायव्हेट वाहनाचे वाहनधारक आव्वा सव्वा रुपये घेऊन मनमानी पद्धतीने भाडे घेतात यामुळे विद्यार्थी, महिला व ७५ वर्षाचे जेष्ठ नागरिक खूपच त्रस्त झाले आहे. ७५ वर्षा वरील जेष्ठ नागरिकांना एसटी बसचा मोफत प्रवास नुस्ताच नावालाच का एकीकडे शासन या योजनेच्या माध्यमातून सरकार लोकांच्या उन्नतीसाठी त्यांच्या प्रगतीसाठी प्रयत्न करत आहे.

महाराष्ट्र Business Katta












# हिवाळी अधिवेशन : नागपूर कराराला हरताळ



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनाचे कामकाज येत्या ७ डिसेंबर पासून सुरू झाले आहे ते २० डिसेंबरपर्यंत चालणार आहे. पहिल्या आठवड्यात दोन दिवस, दुसऱ्या आठवड्यात पाच दिवस तर तिसऱ्या आठवड्यात तीन दिवस सभागृह चालणार आहे. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. खर तर विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन किमान ४ ते ६ आठवडे उपराजधानीत घेण्यात यावे, असे नागपूर करारानुसार ठरले आहे. मात्र, आतापर्यंतच्या राज्यकर्त्यांनी एकदाही सहा आठवडे सरकार येथे आणले नाही. एखाद-दोन अपवाद वगळता २ ते ३ आठवडे विधिमंडळाचे कामकाज चालले. पहिल्या युतीच्या काळात कराराचे पालन करण्याची ग्वाही तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी दिली होती.**

मात्र, त्यांच्या काळातही चार-पाच आठवडे अधिवेशन झाले नाही. विदर्भातील मुख्यमंत्र्यांनी बराच काळ राज्यात सत्ता चालवली. मात्र, कराराचे पालन झाले नाही.

विदर्भाच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी व ते मार्गी लावण्यासाठी दरवर्षी (काही वर्षांचा अपवाद वगळता) नागपूर येथे विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन घेतले जाते. पण चर्चा कमी आणि गोंधळ, राजकीय घडामोडींनीच हे अधिवेशन अधिक गाजते. विदर्भाच्या पदरी ठोस असे काहीच पडत नाही. त्यामुळे नागपूर अधिवेशन ही केवळ औपचारिकता ठरत आहे. या अधिवेशनातून ही या प्रदेशाच्या हाती काही लागेल याची शक्यता कमीच आहे. १८५४ पासून ते १९५६ पर्यंत म्हणजेच तब्बल १०२ वर्ष नागपूर ही ब्रिटिश कालीन नागपूर प्रांताची राजधानी होती. १९५३ च्या डिसेंबरमध्ये केंद्र सरकारच्या जस्टिज फजल अली यांच्या अध्यक्षतेखाली या देशातील पहिले राज्य पुनःरचना आयोग प्रस्थापित केले गेले.

महाराष्ट्राच्या निर्मितीवरून काँग्रेस नेत्यांमध्ये संभ्रम होता. त्यावर तोडगा काढण्यासाठी डॉ. एस. एम. जोशी यांनी या सगळ्या विरोधी पक्षांचे नेतृत्व स्वीकारून संयुक्त महाराष्ट्र परिषद स्थापना केली. राज्यातील विविध भागातील नेत्यांनी एकत्र येऊन प्रयत्न केले पाहिजे असा तोडगा काढण्यात आला. त्यासाठी सप्टेंबर १९५३ मध्ये राज्यातील सर्व प्रतिनिधी नागपूरात जमले.

सर्वानूमते २८ सप्टेंबर १९५३ मध्ये नागपूर करार करण्यात आला. धर्मवीर भाऊसाहेब हिरे यांनी नागपूर करारात महत्त्वाची भूमिका बजावली होती. या करारावर पश्चिम महाराष्ट्रासाठी भाऊसाहेब हिरे, यशवंतराव चव्हाण, नाना कुंटे, देवकीनंदन नारायण, यांनी तर महाविदर्भातून रा. कृ. पाटील,रामराव देशमुख, पंजाबराव देशमुख, शेषराव वानखेडे यांनी सह्या केल्या. मराठवाड्यासाठी देवीसिंह चव्हाण, लक्ष्मण भाटकर,प्रभावतीदेवी जकातदार या नेत्यांनी सह्या केल्या.

करारातील मुद्दे कोणते?

राज्याच्या पुनर्रचनेच्या संदर्भात विचार करण्यासाठी एक उच्च अधिकार समिती स्थापन करावी. मुंबई मध्यप्रदेश,हैदराबाद प्रांतातील मराठी भाषिकांना



एकत्र करून स्वतंत्र महाराष्ट्र राज्य स्थापन करावे व त्याची राजधानी मुंबई असावी. राज्यातील सरकारच्या प्रशासकीय सेवेसाठी राज्याचे तीन प्रशासकीय विभाग असावेत जसे महा विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र असे असतील. राज्याच्या उच्च न्यायालयाचे प्रमुख केंद्र मुंबई येथे असावे उपकेंद्र नागपूरची निवड करण्यात आले. तर, राज्याच्या कायदेमंडळातील जनतेचे प्रतिनिधित्व लोकसंख्येच्या प्रमाणात ठेवावे. शासकीय व निमशासकीय सेवेतील उमेदवारांची भरती करताना ती लोकसंख्येच्या प्रमाणात करण्यात यावी. नागपूर करारातील मुद्द्यांचा विचार करून डिसेंबर १९५३ साली केंद्र सरकारने ठरवले की राज्याच्या पुनर्रचना करण्याकरिता ठोस असे काहीतरी केले पाहिजे. आणि त्या दृष्टिकोनातून न्यायमूर्ती सय्यद फाजल अली यांच्या अध्यक्षतेखाली डिसेंबर १९५३ साली एक राज्य पुनर्रचना आयोग नेमण्यात आला. त्या आयोगाचा अहवाल जेव्हा पुढे आला ऑक्टोबर १९५५ मध्ये त्यानंतर १९५६ नंतर भाषावार प्रांतरचना आपल्याकडे लागू झाली.

त्या करारानुसार नागपूरला राजधानीचा दर्जा गमवावा लागला. याचे दुःख जिव्हारी लागू नये यासाठी संयुक्त महाराष्ट्राच्या अधिवेशनाचे एक अधिवेशन वर्षातून एकदा तरी नागपुरात घेण्यात यावे अशी तरतूद १९५३ च्या करारात करण्यात आली. करारानुसार १९६० च्या पहिल्या अधिवेशनाचे हिवाळी अधिवेशन नागपुरात संपन्न झाले ते आज तागायत नागपुरला भरवले जाते. मात्र नागपूर कराराचे कधीच पालन करण्यात आले नाही.

# वाढदिवस दक्षिणेतील देवाचा



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**दक्षिणेतील देव अशी ओळख असलेले सुपरस्टार रजनीकांत यांचा आज ७३ वा वाढदिवस. सुपरस्टार रजनीकांत यांच्या शिरपेचात दोन वर्षांपूर्वी एक मानाचा तुरा रोवला गेला होता. रजनीकांत यांना चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च अशा मानाच्या दादासाहेब फाळके पुरस्काराने मागील वर्षी गौरविण्यात आले होते. ६७ व्या राष्ट्रीय फिल्म पुरस्कार सोहळ्यात तत्कालीन उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू आणि केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांच्या हस्ते त्यांना या मानाच्या पुरस्काराने गौरविण्यात आले होते. रजनीकांत यांना यापूर्वी पद्मभूषण (२०००) व विद्मविभूषण (२०१६) या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. जिवंतपणीच आख्यायिका बनलेले रजनीकांत हे एक अवलिया व्यक्तिमत्त्व.**

रजनीकांत यांच्या नावावर अनेक विनोद, टोमणे, उपदेश, म्हणी, मिम्स प्रचलित आहेत. रजनीकांत यांचे देश विदेशात हजारो फॅनक्लब्ज आहेत. रजनीकांत यांना उद्देशून एखादा अपशब्द जरी काढला तरी तामिळनाडूत दंगली उसळतात. त्यांच्या इतकी लोकप्रियता कोणत्याच अभिनेत्याला मिळालेली नाही. त्यांचा चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच सुपरहिट झालेला असतो. त्यांच्या चित्रपटाचे तिकीट काढण्यासाठी प्रेक्षक पहाटेपासूनच रांगा लावतात. त्यांच्या फोटोवर दुग्धाभिषेख करतात. तामिळनाडूत तर त्यांची मंदिरे आहेत. देवाप्रमाणे लोक त्यांची पूजा करतात. १२ डिसेंबर १९५० रोजी बंगळुरू येथे एका महाराष्ट्रीयन कुटुंबात रजनीकांत यांचा जन्म झाला. त्यांचे खरे नाव शिवाजीराव गायकवाड असून त्यांच्या वडिलांचे नाव रामोजीराव गायकवाड असे असून आईचे नाव जिजाबाई असे आहे. पुरंदर तालुक्यातील मावडी-कडेपठार हे त्यांचे मूळ गाव. ८० - ९० वर्षांपूर्वी



त्यांचे कुटुंब बंगळुरात स्थलांतरित झाले व तिथेच स्थायिक झाले. त्यांचे वडील कर्नाटक पोलिसात शिपाई होते. रजनीकांत यांना लहानपणापासून अभिनयाचे वेड होते. अभिनयाचे वेड जपत त्यांनी अनेक लहानसहान कामे केली. बारावी पास झाल्यावर काही काळ त्यांनी बस कंडक्टर म्हणूनही काम केले. नशिब आजमावण्यासाठी त्यांनी मद्रास फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये प्रवेश घेतला आणि सिनेजगताला एक सुपरस्टार मिळाला. अपूर्ण रागंगल या तामिळ चित्रपटातुन त्यांनी आपल्या फिल्मी करियरची सुरवात केली. आजवर त्यांनी १५० हुन अधिक चित्रपटात भूमिका केल्या. अंधा कानून या चित्रपटातून त्यांनी बॉलिवूड मध्ये पदार्पण केले. केवळ तामिळ आणि हिंदीच नव्हे तर कन्नड, तेलगू, तामिळ, बंगाली, इंग्रजी चित्रपटातून भूमिका केल्या. चार दशकांहून अधिक काळ आपल्या अभिनयाने चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवणारे रजनीकांत हे आपल्या अभिनयाबरोबरच आपल्या डॅशिंग स्टाईल आणि स्टंटसाठीही ओळखले जातात. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वजण त्यांचे चाहते आहेत. दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीचे अनभिषिक्त सम्राट, प्रेक्षकांची गर्दी खेचून आणणारे, आपल्या संवाद फेकीबद्दल प्रसिद्ध आणि विशिष्ट स्टाईलबद्दल प्रसिद्ध आणि आपल्या विशिष्ट अभिनय शैलीसाठी रजनीकांत ओळखले जातात. दक्षिण भारतात त्यांच्या नावे सर्वात जास्त यशस्वी चित्रपट आहेत. त्यांचा चाहतावर्ग देशातच नाही तर विदेशातही आहे. जपानमध्ये त्यांचा मोठा चाहतावर्ग आहे. तिथे त्यांचे चित्रपट अधिक लोकप्रिय आहेत. तिथे त्यांचे फॅनक्लब्जही आहेत. सर्वाधिक चाहतावर्ग असलेला अभिनेता म्हणून त्यांची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये त्यांची नोंद झाली आहे. त्यांना चार वेळा सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कारही मिळाला आहे. रजनीकांत जितके अभिनेते म्हणून श्रेष्ठ आहेत तितकेच ते माणूस म्हणूनही श्रेष्ठ आहेत. ते त्यांना मिळणाऱ्या माधनाच्या एकूण ४० टक्के एव्हढी रक्कम समाजसेवेसाठी वापरतात. रजनीकांत हे असे एकमेव अभिनेते आहेत की जे एकाही उत्पादनाची जाहिरात करत नाहीत उद्देश एकच की लोकांमध्ये कोणताही चुकीचा संदेश जाऊ नये. जिवंतपणीच आख्यायिका बनलेल्या या सुपरस्टारला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

# तो पैसा आणि ती माणसं...



बबन गुळवे
मुंबई. मो.९७३०९३९७३२

आधुनिक केसरी

**आपल्या अवतीभवती दोन गोष्टी ठळकपणे पहायला मिळतात. त्या दोन गोष्टी म्हणजे गरीबांचा जीवन जगण्याचा संघर्ष आणि श्रीमंतांचा आपल्याच मस्तीत राहण्याचा फंडा! एकीकडे गरीबांना दररोज दोन वेळा पोटाची खळगी भरण्यासाठी अपार कष्ट करावे लागतात तर दुसरीकडे श्रीमंत लोक आपल्या जवळ आणखी जास्त पैसे कसे येतील याचा विचार करत असतात. गरीबांची जीवन जगण्यासाठी धडपड सुरु आहे तर जास्तीत जास्त पैसा मिळवण्यासाठी श्रीमंतांची तडफड सुरू आहे.**

एकाचे कष्ट हेच जीवन आहे तर दुसऱ्याचे पैसा हा सर्वकाही आहे. एकाकडे कुटुंबाला सुखी ठेवण्याची वृत्ती आहे आणि दुसऱ्याकडे खूप पैसा मिळवण्याची हाव आहे. दरवर्षी जगातील सर्वात जास्त श्रीमंत लोकांची यादी जाहीर होत असते.ही यादी जाहीर होते कारण तेवढ्या अमाप संपत्तीचे ते लोक मालक झालेले असतात.आपल्या भारतातील काही उद्योगपती त्या श्रीमंतांच्या यादीत झळकतात.पण श्रीमंतांची यादी जसे जाहीर होते तसे जगातील सर्वात गरीब लोकांची यादी जाहीर का केली जात नाही?याचे कारण असे की या जगात गरीब लोक खूप आहेत.नव्हे ही गरीबांचीच दुनिया आहे.आणि या गरीबांचे उत्पीडन व शोषण ठरलेले आहे.
हे गरीब लोक कामगार,मजूर व श्रीमंतांचे नोकर असतात. यांना फार कमी मोबदल्यात दिवसभर राबून घेतले जाते. इतिहास साक्षीदार आहे की या जगात जे जे लोक श्रीमंत झाले त्यांनी गरीबांचे शोषण केलेले असते.आजही तेच सुरु आहे. शेतकऱ्यांचा शेतमाल कमी दराने खरेदी करणारे व्यापारी झटपट श्रीमंत होतात हे वेगळे सांगण्याची गरज नाही.कमी पगाराच्या कामगारांच्या जीवावर कारखानदार गर्भ श्रीमंत बनतात.

खरेतर समाधान हेच खरे सुख असते.गरीब लोक दिवसभर हाताला मिळालेले काम करतात.त्याच्या बदल्यात मिळालेला रोजगाराचा पैसा हीच त्यांची कमाई असते.त्यावर कुटुंबातील सर्व सदस्यांचा उदरनिर्वाह चालतो.

दिवसभर काम करून थकल्याने हे गरीब पोटभर जेवण करतात आणि सुखाची गाढ झोप घेतात.दुसऱ्या दिवशी आळस झटकून पुन्हा कष्टाला तयार. परंतु,श्रीमंतांचे तसे नाही. आरामदायी खुर्चीवर बसून व्यवसाय सांभाळताना शरीराची हालचाल होत नाही. शरीराला कष्ट व अंगमेहनत माहीत नसते. त्यामुळे पोटाला पोटभर भूक लागत नाही, रात्री गाढ झोप लागणे फार दूरची गोष्ट होते.परिणामी वेगवेगळे आजार जडतात आणि डॉक्टर 'हे खाऊ नका,ते खाऊ नका' बजावून सांगतात.पैशाच्या जोरावर बंगला, गाडी,सर्व महागड्या वस्तू मिळतात परंतु चांगले आरोग्य व सुखाची झोप पैशाच्या जोरावर खरेदी करता येत नाही.म्हणजे पैसा जीवन जगण्याचे साधन आहे परंतु पैसा जीवनाचे सर्वस्व होऊ शकत नाही. तुम्ही कमावलेली संपत्ती तुमच्या पुढील पिढ्यांना श्रीमंतीचे वलय देऊ शकते पण गरीबांसारखे सुख नाही देऊ शकत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी पुस्तकांसाठी बंगला बांधला.



कारण ज्ञान हेच या जगात सर्वात जास्त श्रीमंत आहे हे त्यांना सांगायचे होते.सगळे राजवैभव त्यागून ज्ञानप्राप्ती केलेल्या तथागत गौतम बुध्दांनी सुखी जीवन जगण्यासाठी सम्यक दृष्टी आत्मसात करण्याची शिकवण दिली. महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपले घरदार समाजाला अर्पण केले.छत्रपती शिवाजी महाराजांनी आपले स्वराज्य केवळ बहुजन रयतेसाठी स्थापन केले होते. म्हणून हे महामानव आपल्या हृदयात कायमचे विराजमान झाले आहेत. बाबा आमटे यांनी मनात आणले असते तर अलिशान बंगले बांधले असते पण त्यांनी आपली वैद्यकीय सेवा कुष्टरोगी व गरीबांना अर्पण केली.त्यांनी पैसा गौण मानला आणि माणसाला महत्त्व दिले.

म्हणून या जगात माणूस महत्त्वाचा आहे.अडचणीच्यावेळी पैशापेक्षा जोडलेली माणसे कामाला येतात.जीवनात पैसा येतो जातो परंतु एकदा दुरावलेली माणसे पुन्हा जवळ येणे फार कठीण.गरजेपुरता पैसा जरुर कमवा पण त्यापेक्षाही जास्त माणसे कमवावीत.हीच माणसे शेवटपर्यंत साथ देतात अगदी स्मशानापर्यंत! आणि सरणावर जळणारा आपला मृतदेह पाहून ते हळहळतात.यावेळी आपण कमावलेला पैसा कपाटात निपचित पडलेला असतो, निर्जीव बिच्चारा!


# सामान्यांतील असामान्य लोकनेता!



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**महाराष्ट्राच्या ऐतिहासिक राजकारणाच्या पटलावर बोटांवर मोजण्याएवढे असे धुरंधर राजकारणी आहेत ज्यांनी आपल्या हयातीत आपली स्वतंत्र ओळख निर्माण करून देशाच्या राजकारणात छाप उमटवली. या धुरंधर मंडळींमध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, श्री यशवंतराव चव्हाण, श्री वसंतराव नाईक, लेखक-वक्ते श्री प्र.के.अत्रे, श्री प्रमोदजी महाजन, श्री अटलबिहारी वाजपेयी, हिंदुहृदय सम्राट श्री बाळासाहेब ठाकरे, मा.श्री शरदचंद्रजी पवार, भारताचे विद्यमान लोकप्रिय पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी आणि याच महानुभावांच्या रांगेतील अगदी सन्मानाने घेतले जाणारे नाव म्हणजे मराठवाड्याचे भूमिपुत्र स्व.लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब!**



ही सर्वच नावे तिसऱ्या जगातील असून यांना राजकारणाचा कोणताही वसा-वारसा लाभला नसतांना स्वतःच्या कर्तृत्वावर यशाची अनेक शिखरे पादाक्रांत करून आपापल्या काळावर आपला चिरकाल ठसा उमटवला आहे! ही सगळीच मंडळी उपेक्षित-वंचित परिस्थितीतून येऊन मोठी झाली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे संपूर्ण जीवनच संघर्षात गेले. काही काळ संसदेत काम करण्याची संधी मिळाली असता तिथेही उपेक्षेचे चटके सोसावे लागले परिणामी केंद्रीय कायदे मंत्रीपदाचा राजीनामा देऊन बाबासाहेब मंत्रिमंडळाबाहेर पडले. जवळपास या सर्वच लोकांच्या जीवनात टोकाचा संघर्ष करण्याची वेळ आली आणि त्यांनी ती मोठ्या ताकदीने पेलून आपले अस्तित्व निर्माण केले. याच प्रकारचा खडतर जीवन-संघर्ष स्व.गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या वाट्याला आला, परंतु मुंडे साहेब जीवनभर कुठेही न झुकता आपला संघर्ष करत राहिले आणि इतिहासाच्या पानावर त्यांचा अजोड संघर्ष अजरामर राहिला!

मराठवाड्याच्या मागास बीड जिल्हातील उसतोड कामगारांच्या डोंगरपट्ट्यातल्या परळी तालुक्यातील नाथ्रा गावात स्वातंत्र्याच्या पहिल्या दशकांत जन्मलेले गोपीनाथ मुंडे म्हणजे संघर्षाचे दुसरे नाव! परळी तालुक्यातील नाथ्रा गावापासून ते युनोमध्ये भारताचे प्रतिनिधित्व आणि भारतीय संसदेत केंद्रीय मंत्रिपदांपर्यंतचा प्रवास काही एवढा सहज आणि एका ओळीत लिहिण्यासारखा नक्कीच नाही! अंबाजोगाईच्या महाविद्यालयातून सुरु झालेला गोपीनाथराव मुंडे साहेबांचा प्रवास सर्वांनाच थक्क करणारा आहे. स्व.प्रमोदजी महाजन यांच्यासोबतची मैत्री मुंडे साहेबांच्या जीवनात एवढी अमुलाग्र क्रांती आणेल याची कुणाला तिळभरसुद्धा कल्पना नव्हती. महाजन-मुंडे या महाविद्यालयीन स्तरावरील जोडीचे रुपांतर घट्ट मैत्रीत झाले. घरचे वारकरी संस्कार मुंडे साहेबांना जीवनभर कामाला आले. वडील श्री पांडुरंगराव मुंडे हे लहानग्या गोपीनाथला कीर्तन-भजनाला घेऊन जायचे. दुर्दैवाने वयाच्या विसाव्या वर्षी वडिलांचे निधन झाले आणि पुढील शिक्षणाची जबाबदारी मोठ्या सक्षमपणे मुंडे साहेबांचे जेष्ठ बंधू श्री पंडितअण्णानी उत्तमपणे पेलली. गोपीनाथरावांचे शिक्षण बंद पडू दिले नाही. अण्णांनी गावाकडील शेती-बाडी सांभाळून गोपीनाथराव मुंडे साहेबांचे शिक्षण बंद पडू दिले नाही. दुसरीकडे गोपीनाथराव पुणे येथे जनसंघाच्या चळवळीने झपाटून गेले. तेथे श्री वसंतराव भागवतांच्या संस्काराने त्याची देशभक्तीची विचारसरणी दृढ झाली. पुण्यात विद्यार्थी संसदेच्या निवडणुका, नंतर जनसंघ आणि शेवटी भाजपाच्या प्रचारकार्यात मुंडे-महाजन जोडगोळीने प्रवेश केला. शेठजी-भटजींचा पक्ष असा शिक्का बसलेल्या भाजपला पुणे-मुंबई आणि अन्य शहरातून बाहेर काढून विदर्भ, कोकण, मराठवाडा आदि सर्व भागात नेऊन पोहचवण्याचे मूलगामी कार्य मुंडे-महाजन जोडगोळीने मोठ्या हिमतीने केले. बाहेर प्रचार करतांना गोपीनाथराव मुंडेंचे लक्ष आपल्या परळीवर होतेच. १९७८ च्या बीडच्या जि.प.निवडणुकीत अंबाजोगाईच्या उजनी गटातून ते बीड जिल्हा परिषदेवर निवडून आले आणि त्यांनी पुन्हा मागे वळून पहिलेच नाही! १९८० मध्ये निवडणुका लागल्या आणि तिशीतील गोपीनाथराव मुंडेंनी परळी मतदार संघातून विधानसभेची निवडणूक लढवली आणि जिंकली सुद्धा! पहिल्यांदाच मराठवाड्यातून आणि महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून भाजपच्या नावाखाली निवडून येण्याचा सन्मान श्री गोपीनाथराव मुंडेंना मिळाला. त्यानंतर एकावर एक संधी त्यांना मिळत राहिल्या आणि त्यांनी त्या सर्वच संधींचे सोने केले. पुढे भाजयुमो चे प्रदेशाध्यक्ष, भाजपचे प्रदेशाध्यक्ष अशा एक ना अनेक संधी त्यांच्या कर्तृत्वाच्या जोरावर मिळाल्या. या पदांचा फायदा मुंडे साहेबांनी आपल्या पक्षाला मोठ्या प्रमाणात करून दिला. श्रीमंत आणि उच्चभ्रू लोकांमध्ये असलेला शेटजी-भटजींच्या भाजपची पाळेमुळे बहुजन समाजाच्या मनामनात खोलवर रुजविण्याचे श्रेय मुंडे-महाजन जोडगोळीला जाते! गोपीनाथराव मुंडे साहेबांनी राजकारणात अनेक दैवी वरदान असल्यासारखे महान कार्य करून दाखवले. भाजप पक्षांत अठरापगड जातींच्या लोकांना चुंबकासारखे खेचण्याचे काम मुंडेंच्या वक्तृत्व, व्यक्तिमत्व आणि कर्तृत्वाने केले. बहुजन समाजासाठी राजकारणात असलेला अवकाश मोठ्या शिताफीने मुंडे साहेबांनी भरून काढला. साळी-माळी-धनगर-बंजारा-वंजारी-मुसलमान सारखी उपेक्षित वंचित जाती-धर्मांच्या लोकांना देशाच्या मुख्य राजकीय प्रवाहात खेचून आणण्याचे महान कार्य गोपीनाथराव मुंडे साहेबांनी केले! एवढेच काय उपेक्षित आणि दुर्लक्षित मराठा समाजाच्या नव्या नेतृत्वाला भाजपमध्ये संधी देऊन सर्व जातींची एक मजबूत मोठ बांधण्याचे कार्य मुंडे साहेबांनी केले. एकानंतर एक पदांवर काम करतांना १९९२ ते १९९५ काळात गोपीनाथरावांनी महाराष्ट्राच्या विधानसभेत विरोधीपक्षनेता म्हणून काम केले. इथेच मुंडे साहेबांची उरली सुरली ओळख महाराष्ट्राच्या तमाम जनतेला झाली. थोड्याच काळात गोपीनाथराव हे भाजप आणि उपेक्षितांचा चेहरा बनले. या सगळ्या गोष्टी जुळून आणण्यासाठी त्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले, रात्रंदिवस प्रवास, गावोगाव-खेड्यापाड्यातील सामान्य माणसांच्या भेटीगाठी घेऊन जनसामान्य लोकांमध्ये आत्मविश्वास जागृत केला. लाखोंच्या सभा जिंकण्याचे कसब, खडा आवाज, भारदस्त व्यक्तिमत्व, ग्रामीण आणि शहरी लोकांची नाडी पकडून-लोकांचा प्रतिसाद घेऊन बोलण्याची संभाषण कलेच्या देणगीने गोपीनाथरावांनी संपूर्ण महाराष्ट्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली. एक दशकांच्या कामात मुंडे साहेब महाराष्ट्रातील ओबीसी आणि वंचित-शोषितांचा चेहरा झाले. त्यांनी १९९४ साली संघर्ष यात्रा काढून राजकारणातील गुन्हेगारीकरण, भ्रष्टाचार, जळगावचे सेक्सस्कँडलयातून मुंडे साहेबांनी महाराष्ट्रभर रान उठवले. तत्कालीन सरकारवर विधानसभेत आणि विधानसभेबाहेर घणाघाती हल्ले करून सरकारमधील मंत्र्यांना नामोहरम केले. महाराष्ट्राच्या राजकारणात मुंडे नावाचे नवे वादळ घोंगावत होते आणि त्या वादळात भल्याभल्यांचे राजकीय मनसुबे धुळीला मिळाले! याचा कळस म्हणजे मुंडे साहेब दोनवेळा बीड मतदार संघातून लोकसभेवर निवडून गेले. लोकनेते गोपीनाथराव आणि महाराष्ट्राच्या सुदैवाने केंद्रात भाजपचे बहुमत आले आणि श्री नरेंद्र मोदींच्या पहिल्या मंत्रिमंडळात गोपीनाथरावांना केंद्रीय ग्रामविकासमंत्री हे कॅबिनेट मंत्रिपद मिळाले! दुर्दैवाने हा आनंद जास्त काळ टिकू शकला नाही आणि ३ जून रोजी मुंडे साहेबांचे अपघातात निधन झाले! महाराष्ट्राच्या राजकारणात फार मोठी पोकळी निर्माण झाली. राजकारणाच्या आणि जात-धर्म या पलीकडे आपली ओळख निर्माण करणारा असा लोकनेता पुन्हा होणे नाही. विद्यमान काळात राजकारणाने कूस बदलली असून अनेक नवनवीन समीकरणे समोर येतांना मतदार गोंधळून गेला आहे. मा.शरदचंद्रजी पवार आणि मा.नितीनजी गडकरी या एक-दोन नेत्यांशिवाय सर्वच महाराष्ट्राचे भले करणारे सर्वसमावेशक मुंडे साहेबांसारखे नवे नेतृत्व उभे राहणे गरजेचे आहे. राजकारणातील कट्टरतेचे निर्मुलन करून लोकांची कामे करणाऱ्या लोकनेत्याची नितांत गरज आज महाराष्ट्राला आहे. आजही सामान्य आणि सर्वच लोक 'आज गोपीनाथराव मुंडे साहेब असते तर असे झाले नसते' असे भावनिक उद्‌गार काढतांना ऐकूण आज मन व्यथित होते! चला पुन्हा एखादे सामान्यांतून असामान्य गोपीनाथराव मुंडे उदयास येतील अशी प्रतीक्षा करून स्व.मुंडे साहेबांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन करूयात! जय हिंद! जय भारत!

# बालमनाला वळण लावणाऱ्या प्रेरणादायी कथा




गुलाब बिसेन
संपर्क क्र. 9404235191

आधुनिक केसरी

**बालसाहित्याला संवेदनशीलता आणि निरागसतेचा स्पर्श झाला की ते साहित्य बालवाचकांच्या पसंतीस पडते. बालसाहित्यात संवेदनशीलता आणि निरागसतेची पेरणी करणारे बबन शिंदे हे आघाडीचे बालसाहित्यिक आहेत. आजपर्यंत त्यांनी बालकुमारांसाठी कथा, कविता, कादंबरी, नाटक लिहिलेले आहे. बालसाहित्यात दुर्मिळ असणा-या समीक्षाग्रंथातही मोलाची भर टाकली आहे. तसेच ग्रामीण साहित्यातही त्यांनी कथा, कविता लिहिल्या आहेत. त्यांचा "प्रेरणादायी कथा" हा कुमार कथासंग्रह अलीकडेच प्रकाशित झाला आहे. कथांच्या माध्यमातून बालवाचकांना प्रेरीत करण्याचा त्यांचा हा प्रयत्न निश्चितच कौतुकास पात्र आहे.**

संवेदनशील बालमन आपल्या सभोवती घडणाऱ्या घटना, दिसणारे दृश्य, मोठ्यांचे वागणे बोलणे यातून खूपकाही शिकत असते. या अनुभवांतून तो प्रेरणा घेऊन आपल्या जीवनाची वाटचाल करण्यास तयार होत असतो. अशा बालमनावर कथांच्या माध्यमातून प्रेरणा देण्याचे काम "प्रेरणादायी कथा" या कुमारकथा संग्रहाच्या माध्यमातून लेखक बबन शिंदे यांनी यशस्वी प्रयत्न केला आहे. या कथासंग्रहामध्ये एकुण चौदा कथांचा समावेश करण्यात आला आहे. या संग्रहातील सर्वच कथा या आपल्या अवतीभवती घडणाऱ्या आहेत. सभोवतीच्या परिस्थितीचे सूक्ष्म निरीक्षण करून त्यातून घेण्यासारखे काय आहे याचा सारासार विचार करून कथांची मांडणी लेखकाने केलेली आहे. त्यामुळे त्या बालवाचकांच्या पसंतीस पडतील.

"प्रेरणादायी कथा" हा कथासंग्रह वाचताना वाचकाला ते कथानक आपल्या अवती भवती घडतेय असा भास झाल्याशिवाय राहत नाही. खोडकर रोहनची "रोहन" ही कथा वाचताना त्याची प्रचिती वाचकाला येते. घरी, शाळेत, शेजारीपाजारी सर्वांच्या नाकात दम करून सोडणारा रोहन लाईट गेल्याने लिफ्टमध्ये अपघाताने अडकतो, तेव्हा त्याला मिळालेला धडा सर्वांना प्रेरणादायी आहे. लहान मुलांची खेळणी विकणाऱ्या माणसाची "बडे चाचा" ही कथा वाचल्यावर बडे चाचांच्या आयुष्याला अपघाने मिळालेली कलाटणी, त्यातही त्यांचे मुलांवर माया करणे, कधीकधी खेळणी फुकट देणे, मुलांशी प्रेमाणे वागणे वाचकाच्या मनात खोलवर रुजणारे आहे. आपल्या सभोवती असणाऱ्या पशुपक्ष्यांना आपण माया लावली. त्यांच्यावर प्रेमाची फुंकर मारली की तेही तितकीच माया आपल्यावर लावतात. काहीवेळा हे प्राणी पाळीव नसले तरी ते त्यांच्या मनातील प्रेम माया त्यांच्या पद्धतीने व्यक्त करतात. हे "जीवदान" या कथेतून वाचकाला अनुभवायला मिळते.



सभोवताली घडणाऱ्या घटनांचा अनुबंध लावून त्या कथाबिजातून सुंदरशी कथा फुलवण्यात लेखक बबन शिंदे यांचा हातखंडा आहे. या संग्रहातील कथा वाचताना त्याचा प्रत्यय वाचकाला येतो. धरणग्रस्तांच्या समस्यांना वाचा फोडतानाच त्याचा बालमनावर झालेला परिणाम दाखवणारी "भ्रमनिराश" ही कथा सर्व वाचकांना अंतर्मुख करून जाते. नद्यांवर मोठमोठी धरणं बांधली गेली. त्यामुळे धरणाच्या सिंचन क्षेत्राची भरभराट झाली. परंतू विस्थापित झालेल्यांचे पुनर्वसन न झाल्याने गावंची गावं ओस पडली. रोजगारासाठी लोकांनी शहराकडे धाव घेतली. मामाच्या गावी दिवाळी सुट्टीत गेलेला दिनू ओस पडलेलं गाव बघून हताश होतो. त्याचे जुने मित्रही त्याला भेटत नाहीत.

कानबाच्या घरात घुसलेला साप कुणालाही न कळूदेता युक्ती लढवून पिंजऱ्यात पकडणारा नारायण संपूर्ण शाळेत आगाऊ म्हणून प्रसिद्ध पावलेला. परंतु त्याची हुशारी शाळेतील सर्व मुलांना बोटं तोंडात घालायला भाग पाडते. आपल्या चांगुलपणा आणि हुशारीने नारायण गावात कौतुकाचा विषय होतो. लेखक बबन शिंदे यांनी या संग्रहामध्ये कथांची मांडणी करताना मुलांची बुद्धिमत्ता, चिकित्सक वृत्ती, विचारशीलता, संवेदनशिलता या बाबींचा अत्यंत बारकाईने विचार करून केलेली आहे. त्यामुळे या कथा नुसत्या प्रेरणाच देण्याचे काम करत नाहीत तर जगण्याचे भानही देतात. "चलाख प्रदिप" या कथेत प्रदिप चौकस वृत्तीने गावातील मोठ्या चोरीचा छडा लावतो आणि चोर पकडले जातात. मुलांच्यात ऊर्जेचा अखंड प्रवाह सुरू असतो. त्या ऊर्जेला उत्तम वळण लावण्याचे काम या कथांच्या माध्यमातून लेखकाने केले आहे. घरच्या कामधंद्यात, शाळेच्या अभ्यासात आळसावलेला माधव वाचकाला "युक्ती श्रेष्ठ" या कथेत भेटतो. माधवला त्याचे आई बाबा त्यांच्या खेडेगावी घेऊन जातात. तिथे त्याचा चुलत भाऊ गंगाधर शेतीच्या कामात मदत करत असतो. जनावरांसाठी वैरण आणतो. कपडे फाटलेत तरी कोणतीच तक्रार करत नाही. हे सारे बघून माधवच्या स्वभावात होणारा बदल वाचकाला जाणवतो.

'धडा' या कथेत भेटणारा आकाश अँड्रॉईड मोबाईल घेऊन देण्याचे आई बाबांकडे हट्ट धरतो. त्यासाठी तो रूसतो. आईबाबांशी बोलत नाही. जेवतही नाही. अशा आकाशला प्रकाश आणि त्याचे मित्र योग्य धडा शिकवतात. आकाशसाठीची मित्रांची धडपड कथेत वाचताना बालमनावर सकारात्मक परिणाम करून जाते. जिद्द, धाडस आणि मेहनतीची पराकाष्ठा करून सैन्यात दाखल झालेला बजरंग "बजरंग" या कथेत भेटतो. जिवणात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेली जिद्द, धाडस पेरण्याचा प्रयत्न लेखकाने या कथेतून केलेला आहे.

यासोबतच सुंठेवाचून खोकला गेला, वस्ती, हे कागुद कशाचे हायत ?, आता मी वाघ बनणार आहे या कथाही प्रेरणेचा प्रवाह प्रवाहीत ठेवण्यात यशस्वी झाल्या आहेत. लेखक बबन शिंदे यांचा "प्रेरणादायी कथा" हा कथासंग्रह सर्वार्थाने बालवाचकांसाठी प्रेरणेचा उत्तम स्त्रोत ठरेल हा विश्वास आहे.

**पुस्तकाचे नाव - प्रेरणादायी कथा**
**लेखक - बबन शिंदे**
**प्रकाशक - सप्तर्षी प्रकाशन, मंगळवेढा**
**मूल्य - १७५ रू.**

# शेवटच्या गरजूपर्यंत आरोग्य सेवा पोहचवावी : आ. जोरगेवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** वातावरणीय बदलामूळे विविध रोगांची लागण होत आहे. अशात आपण आपल्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे. सेवा भावी संस्थांनी विविध भागात आरोग्य शिबिरांचे आयोजन करुन शेवटच्या गरजु पर्यंत्न आरोग्य सेवा पोहचवावी असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

अष्टभुजा वार्ड येथील लव्ह इंडिया चर्च येथे आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते सदर आरोग्य शिबिराचे उद्‌घाटन करण्यात आले. या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी फादर सुनिल कुमार, डॉ. प्रणाली ढवस, डॉ. हिना पाटील, डॉ. राकेश अंबादी, डॉ. राहुल पाटील, डॉ. मुग्धा पुल्लावार, डॉ. नवीन राव, फादर बिबीन थेक्केकरा, आदींची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले कि, आपण शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात मोठे काम करण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी आपण मध्यमवर्गीय कुटुंबातील मुल शिक्षण घेत असलेल्या शिक्षण संस्थांना बळकट करण्याचे काम सुरु केले आहे. या अंतर्गत अनेक शिक्षण संस्थांना आपण संगणक व ईतर शिक्षण



उपयोगी साहित्य उपलब्ध करुन दिले आहे. तर आरोग्य क्षेत्रातही आपण काम करत आहोत चंद्रपूर महानगरपालिकेच्या वतीने व यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने आपण विविध ठिकाणी आरोग्य शिबिरांचे आयोजन करत आहोत. यावेळी जवळपास दिडशे रुग्णांवर आपण यशस्वी शस्त्रक्रिया केली असल्याचे ते यावेळी म्हणाले. आज आयोजित आरोग्य शिबिरात विविध विषयातील तज्ज्ञ डॉक्टरांनी आपण बोलाविले आहे. नागरिकांनीही या शिबिराचा मोठ्या संख्येने लाभ घेतला पाहिजे. आपल्यासाठी आयोजित असे आयोजन आपल्या सहकार्यातुनच यशस्वी होत असतात. धकाधकीचे व व्यस्त जीवन जगत असतांना आपण आरोग्याकडे दुर्लक्ष करु नये, महिलांनी विशेषतः आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी असे आवाहणही यावेळी बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी केले. यावेळी परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने आरोग्य शिबिराचा लाभ घेतला.

## भाजयुमोचे जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब पा. तांदळे

आधुनिक केसरी न्यूज



**गणोरी :** बाळासाहेब पाटील तांदळे यांची भाजयुमो च्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा सरचिटणीस निवड केली. जिल्हाध्यक्ष संजन बागल यांनी ही निवड केली. निवडीबद्दल केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे केंद्रीय मंत्री अर्थ डॉ. भागवत कराड आ. हरीभाऊ बागडे कॅबिनेट मंत्री अतुल सावे, विजय औताडे, सुहास शिरसाठ, मंगलाताई वाहेगावकर, अनुराधाताई चव्हाण, सांडु जाधव, ईलास शहा, ऐश्वर्याताई गाडेकर, गंगाताई ताढे, सर्जेराव मेटे, राजु तुपे, सुचित बोरसे, गोपाल वाघ, राजु डकले, रविंद गायकवाड, विलास उबाळे, आजिनाथ तांदळे, कैलास सोनवणे, रामु भादवे आदींनी अभिनंदन केले.

# शिवणी जामगा येथील शेतकरी विठ्ठल बालाजी जामगे यांचे ६ एकर उसाचे पीक जळून खाक!

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** तालुक्यातील शिवणी जामगा शिवारात टेव्टीवन साखर कारखाना जवळ असलेल्या ऊसाच्या फडाला विद्युत तारेच्या फॉल्टमुळे आग लागुन विठ्ठल बालाजी जामगे यांचा व त्यांच्या नातेवाईक यांच्या नावावर आसलेल्या जमिनील ऊस पिकाला लागलेल्या आगीत ६ एकर शेतीतील उभ्या पिकाचे नुकसान झाले आहे सदरील ऊस शेतीला शिवणी जामगा सज्जाचे तलाठी दुधाटे व कृषी सहाय्यक सौ, कोपनर मॅडम यांनी भेट देऊन पंचनामा केला आहे, दोन वर्षांपूर्वीच सदरील शेतकरी विठ्ठल बालाजी जामगे यांच्या संयुक्त कुटुंबाने ५ कि मी अंतरावर असलेल्या गोदावरी नदीवरून पाईप लाईन द्वारे शेती ला बँक लोन करून पाणी पुरवठा केला आहे, पण विद्युत तारे च्या फॉल्ट मुळे सदरील ऊस शेतीत आगेची ठिंनगी पडुन या संयुक्त कुटुंबातील शेतकरी यांचे ९ लाख १० रुपयांचे आर्थिक नुकसान झाले असून सदरील शेतकरी बांधवाना शासनाने आर्थिक मदत तात्काळ द्यावी अशी मागणी शेतकरी यांनी केली आहे.



## पांडूरंग पा. पवार यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज



**लोहा :** प्रेस संपादक पत्रकार सेवा संघाचे तालुकाध्यक्ष पत्रकार शिवराज पाटील पवार यांना पितृशौक झाला असून त्यांचे वडील पांडूरंग पाटील पवार यांचे दिर्घ आजाराने मुंबई येथील केव्हीएम रुग्णालयात निधन झाले. लोहा तालुक्यातील मौजे पारडी येथील जेष्ठ नागरिक पांडूरंग मारोती पाटील पवार वय ९२ वर्ष यांचे दिर्घ आजाराने मुंबई येथील केव्हीएम रुग्णालयात दि.८-१२-२०२३रोजी सांयकाळी ७.३० वाजता उपचारादरम्यान निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी,५ मुली ३ मुले,सुना ,जावई ,नातवंडे असा मोठा परिवार आहे ते प्रेस संपादक पत्रकार सेवा संघाचे लोहा तालुकाध्यक्ष पत्रकार शिवराज पाटील पवार यांचे वडील होते. कै.पांडूरंग पाटील पवार यांच्या पार्थिवावर दि. ९-१२-२०२३ रोजी दुपारी १ वाजता पारडी येथे शोकाकुल वातावरणात अत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी माजी आमदार रोहिदास चव्हाण, माजी जिल्हा परिषद सदस्य रंगनाथ भुजबळ, मनसेचे जिल्हाध्यक्ष गजानन पाटील चव्हाण, शिक्षण विस्तार सर्जेराव टेकाळे, माजी उपनगराध्यक्ष शरद पाटील पवार, माजी उपसभापती बालाजी पाटील कदम, नगरसेवक करीम शेख यांच्यासह पारडी व लोहा शहर व परिसरातील नागरिक, पत्रकार , शेतकरी, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तरडगावात माऊली सेवा दलाकडून पालखी मार्गात वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** वृक्ष हेच आपले खरे मित्र असतात. हे मित्र आपल्याला अवती भवती असण्यासाठी वृक्षलागवड करणे आवश्यक असते.त्याहून त्या वृक्षांचे संवर्धन करणे सुद्धा तितकेच महत्वाचे असते.वृक्ष लागवडी सोबत वृक्ष संवर्धनाचा कृतिशील कार्यक्रम आखणे अत्यंत गरजेचे असते. असाच कृतीशील कार्यक्रम फलटण तालुक्यातील तरडगाव येथे माऊली सेवा दलाच्या वतीने गावच्या दृष्टीने प्रत्यक्षात कृतीत आणण्यात आलेला आहे.

तरडगाव नगरित सामाजिक बांधिलकी जपत कार्य करणाऱ्या माऊली सेवा दलाकडून हे वृक्ष सेवेचे कार्य करण्यात आलेले आहे. गावच्या मुख्य प्रवेशद्वारा पासून ते विठ्ठल मंदिरा पर्यंत दोन्ही बाजूला मोठ्या कुंडीतून वृक्ष लागवड करण्यात आलेली आहे. आषाढी वारीला श्री. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांचा पालखी सोहळा जेव्हा तरडगाव नगरीत दाखल होत असतो.तेव्हा ज्ञानोबांची पालखी तरडगाव



ग्रामस्थ खांद्यावर घेऊन जात असतात. ज्या पालखी मार्गातून ही पालखी खांद्यावर घेऊन जात असतात. अगदी त्याच पालखी मार्गातून गावच्या मुख्य प्रवेशद्वारा पासून एकूण ४० कुंडी मध्ये वृक्षारोपण करण्यात आलेले आहे. उपक्रमाबद्दल विशेष कौतुक करण्यात येत आहे.आदल्या दिवशी माऊली सेवा दलाचे पदाधिकारी,सदस्य,कार्यकर्त्यांनी रात्री ८ पासून ते मध्यरात्री पर्यंत प्रत्येक ठिकाणी कुंडी ठेवून त्या कुंडीत माती टाकण्यापासून ते वृक्ष लावणे,खत घालणे आणि पाणी ओतण्यापर्यंतचे कार्य पार पाडले.प्रत्येक कुंडीवर माऊली सेवा दल असे लिहिण्यात आलेले आहे.सकाळी या कुंड्यांच्या भोवती आकर्षक रांगोळी काढण्यात आली.मान्यवर,ग्रामस्थ आणि माऊली सेवा दल या सर्वांच्या उपस्थितीत गावच्या मुख्य प्रवेशद्वार येथे काही झाडांना पाणी घालून हा कार्यक्रम संपन्न होत असताना अनेकांनी मनोगते व्यक्त केली. यामध्ये फलटण पंचायत समितीचे माजी सभापती वसंतराव गायकवाड,सदस्या विमलताई गायकवाड, तरडगावच्या सरपंच जयश्री चव्हाण,माऊली सेवा दलाचे अध्यक्ष सतिश गायकवाड,निवृत्ती राऊत गुरुजी, कमिन्स कंपनीचे प्रवीण गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य अतुल गायकवाड, माजी सदस्य विजयकुमार शहा, पांडुरंग गायकवाड आदींनी या उपक्रमाबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या. प्रास्ताविक पर मनोगत व्यक्त करत असताना माऊली सेवा दलाचे अध्यक्ष सतिश गायकवाड यांनी कुंडीतील वृक्ष लागवड संकल्पने बद्दल माहिती दिली. सतिश गायकवाड म्हणाले की, आपण सर्वजण प्रत्येक गोष्ट वापरत असतो.त्याचं काही ना काही आपल्याला मोल मोजावं लागतं. परंतु या जन्मभूमीवर,मातृभूमीवर आपण राहतो. त्याच्या साठी आपण काहीच करत नाही.या मातृभूमीची सेवा म्हणून प्रत्येकाने एक-दोन वृक्ष लावावीत आणि त्यांचे संगोपण करावं.जेणेकरून आपल्या गावाची शोभिका वाढेल.याचा आनंद म्हणून आसपासची गावे हे पाहून अनुकरण करतील. त्यासाठीच आपण सर्वांनी सहकार्य करायचं आहे.आपण सर्वजण उपस्थित राहिलात. असेच पाठबळ आमच्या सोबत राहू द्या.असे सुद्धा सतिश गायकवाड यांनी म्हटले.

# एकलव्य संघटनेकडून भगवानभाऊ कोकाटे यांचा भव्य सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** शासकीय विश्राम गृह येथे भगवान कोकाटे यांना आदिवासी समाज सेवक पुरस्कार मिळाल्याबद्दल एकलव्य संघटनेकडून सत्कार करण्यात आला. त्या अनुषंगाने एकलव्य संघटनेचे प्रदेश सचिव मधुकर तेजराव पवार सर यांनी सध्याची आदिवासी घुसखोरी थांबवण्यासाठी काय केले पाहिजे व माळेगाव भिल्ल समाजाच्या समस्या जाणून घेऊन त्याना मार्गदर्शन केले. सत्कारमुर्ती भगवान कोकाटे यांनी आदिवासी समाज संघटीत होणे काळाची गरज असुन...आदिवासी बांधवानो सावधान! काही बोगस आदिवासी संघटना आदिवासी समाजात सेवेचे काम करीत असल्याचे भासवत आहेत. आम्हीच आदिवासी समाजाचे हितेशी आहोत असा भ्रम निर्माण करीत आहेत. या भ्रमाच्या जाळ्यात आपलेच काही स्वतःला पुढारी समजणारे, काही संघटनांचे ठेकेदार समजणारे लोक फसत आहेत, किंवा काही अल्प स्वार्थासाठी स्वतःहोऊन त्यात अडकत आहेत. त्यांच्या या कृतीमुळे समाजाचे अस्तित्व धोक्यात आले आहे हे त्यांना समजत नाही ही शोकांतिका आहे.काही लोक वनवासी शब्द का उपयोगात आणीत आहे? वनवासी ऐवजी आदिवासी शब्द का उपयोगात आणीत नाहीत ? त्याचे कारण असे आहे की, आदिवासींना वनवासी संबोधनारी टोळी व त्यांचे पुर्वज हे भारतीय नाहीत, ते सर्व भारता बाहेरून आलेले आहेत, हे भारतीय इतिहास सांगतो. त्याचे जळजळीत उदाहरण म्हणजे आदिवासी समाज होय. जोपर्यंत आदिवासी शब्द आहे तोपर्यंत कोणीतरी आदी आहे आणि कोणीतरी नंतर आहे, हे साधे समिकरण चिरंतन राहणार आहे. आदी आणि नंतर हे दोन्ही संकल्पना पुसून टाकण्यासाठी ते आदिवासी शब्द नष्ट करु पाहात आहे. त्यासाठी त्यांनी वनवासी शब्दाची योजना आखली आहे,तसेच आदिवासी ख्रिश्चन, मुस्लिम झालेत त्यांना आदिवासींच्या लिस्टमधून वगळावे, म्हणजेच धर्मांतरित आदिवासींना आरक्षणाचे फायदे देऊ नये. वरवर बघता हे काही नासमज



लोकांना आकर्षक वाटू शकते. परंतु असा विचार करणे हेच मुळात संविधान विरोधी आहे हे लक्षात येत नाही. एकतर अनुसूचित जाती, जमाती यांचे आरक्षण संविधानातील 341,342 या कलमा अंतर्गत आहे. हे आरक्षण सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणावर आधारित आहे. आरक्षणाच आधार धार्मिक अजिबात नाही. धर्मावर आधारित आरक्षण नाही. मग आरक्षणामध्ये धर्म आणणे हेच मुळात संविधान विरोधी आहे. संविधान बदलने म्हणजे काय तर, संविधानातील एक एक कलम असे निष्प्रभ करीत जाणे आदिवासींच्या लोकसंखेतून धर्मांतरित आदिवासी वगळले तर, आदिवासींची टक्केवारी कमी होईल, म्हणजेच शैक्षणिक, नोकरी विषयक, राजकीय आरक्षणावर प्रचंड परिणाम होणार आहे. समाजाला लोकसंखेच्या आधारावर निधी दिला जातो, त्यावर सुध्दा परिणाम होत आहे. याविरुद्ध एकत्रितपणे लोकचळवळ उभी करण्याची गरज निर्माण झाली आहे, त्यासाठी तयार असले पाहिजे...त्यानंर एकलव्य संघटनेची आढावा बैठक व माळेगाव येथील भिल्ल समाजाच्या अडचणी दुर करण्यासाठी सहविचार सभेमध्ये जेष्ठ मंडळी यांनी मनोगत व्यक्त केले. मा. विष्णु कोवे बिरसा क्रान्ती दल यांनी कार्यक्रम ाची प्रस्तावना केली. यांनंतर जिल्हाध्यक्ष विक्की गायकवाड यांनी आभार प्रदर्शन केले. त्या कार्यक्रमासाठी विदर्भ सचिव गुलाबराव ठाकरे .संदिप पिंपळे शहर प्रमुख शिवाजी मोरे तालुका अध्यक्ष एकलव्य संघटना पंढरीनाथ कोकाटे. किशोर माळी, प्रकाश निकम रवींद्र मोरे अर्जुन निकम, सुरेश विरे, बळीराम गायकवाड, शिवाजी बर्डे किसन मोरे, रमेश ठाकरे, सुरेश गायकवाड .माधव गायकवाड. बाळू ठाकरे, गोपाल प्रताप गायकवाड, मदन मोरे,प्रताप गायकवाड, रामकृष्ण लक्ष्मण मोरे. एकनाथ बर्डे, विजय कराळे, शिवम पिंपळे. एकलव्य संघटनेचे शिष्टमंडळ तसेच आदिवासी समाजातील समाज बांधव उपस्थित होते.

# बळीराजाला कर्जमुक्त करा; वीज बील माफ करा

## विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांची विधानसभेत सरकारकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**श्याम हेडाऊ**

**नागपूर :** दुष्काळ, पाणी टंचाई, अवकाळी पाऊस, गारपीट, पिकविमा कंपन्यांची मुजोरी, हमीभावाचे गाजर, निर्यात बंदीचा फटका, बोगस बियाणे तसेच सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे बळीराजा मोठ्या संकटाचा सामना करत आहे. या संकटातून बळीराजाला बाहेर काढण्यासाठी सरकारने बळीराजाला कर्जमुक्त करावे, चाळीस दुष्काळी तालुक्यांप्रमाणे 1 हजार 21 महसूली मंडळांना लाभ द्यावेत, पिकाच्या वर्गवारीनुसार मदत करावी, बिनव्याजी पिक कर्ज द्यावे, वीज बील माफ करावे, राज्यात सरसकट दुष्काळ जाहीर करावा, पिकविम्याची मदत द्यावी, अशी मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी अल्पकालीन चर्चेदरम्यान विधानसभेत केली.

वडेट्टीवार म्हणाले, सरकारने ट्रीगर एक मध्ये 194 तालुके असताना केवळ 40 तालुकेच दुष्काळी घोषीत केले. यावेळी सरकारने केवळ एमआर-सॅक व महा-मदत ही संगणक प्रणालीचा आधार घेतला. पण शेतकऱ्यांच्या अश्रू पाहिले नाहीत. शेतकऱ्यांनी आपले अवयव विकण्यासाठी काढले आहेत. तरी सरकारला लाज वाटत नाही. शासनाकडून तुटपुंजी मदत अपेक्षित नाही. सरसकट हेक्टरी किमान ५० हजार रूपये आणि बागायतीखालील क्षेत्राकरिता प्रति हेक्टरी किमान १ लाख रूपये तात्काळ मदत देण्याची आवश्यकता आहे. 24 ऑगस्टला 2023 आम्ही दुष्काळ जाहीर करण्यासंदर्भात सरकारला पत्र दिले. पण सरकारला जाग आली नाही. कर्नाटकच्या धर्तीवर सरकारने अर्ली ड्रॉट जाहीर केला असता तर शेतकऱ्यांचे भले झाले असते. वडेट्टीवार म्हणाले, देशातील जवळपास 37 टक्के शेतकरी आत्महत्या महाराष्ट्रात होत आहेत. यासारखी लाजीरवाणी गोष्ट



नाही. राज्यात सुमारे 3000 पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. परंतु सरकार गंभीर नाही. महाराष्ट्रात दररोज 7 शेतकरी आत्महत्या करत आहेत. त्यापैकी मराठवाड्यात दररोज 2-3 शेतकरी आत्महत्या करत आहेत. संकटात शेतकरी होरपळला असताना तुम्ही नियम, निकष, जीआरची भाषा करता. जीआर, नियम, निकष शेतकऱ्यांचे जीवन उद्ध्वस्त करत असतील तर बदलले पाहिजेत, असे खडे बोल वडेट्टीवार यांनी सुनावले. पीकविमा कंपन्यांचे मुजोर प्रतिनिधी शेतकऱ्यांचा अपमान करत आहे. अपमानास्पद वागणूक देत आहेत. या कंपन्या दोन, चार रूपये अशी मदत देत आहेत. या कंपन्यांची मुजोरी थांबविली पाहिजे. 8 हजार कोटी रूपये सरकारने या कंपन्यांना दिले. कंपन्यांचा फायदा झाला. यातला वाटा सरकारला मिळत असल्याची चर्चा आहे. सरकार या कंपन्यांचे लाड का पुरवतंय, असा सवाल देखील श्री. वडेट्टीवार यांनी सरकारला केला. संत्रा, तांदूळ, कांदा निर्यातबंदीचा फटका शेतकऱ्यांना बसला आहे. संत्रा उत्पादक शेतकरी निर्यादबंदीमुळे हवालदिल झाला असून तांदूळ निर्यादबंदीमुळे राईस मिल्स उद्योग अडचणीत आले आहेत. रोजगारावर टाच आली आहे. विदर्भातीत या उद्योगांचे 200 कोटींचे नुकसान झाले आहे. त्यामुळे निर्यात बंदी देखील उठवली पाहिजे. बैल गेला आणि झोपा केला अशी या सरकारची परिस्थीती आहे. सरकारने आता प्रचार, निवडणुका, प्रसिद्धी, टेंडर, कंत्राट यातून बाहेर पडून शेतकऱ्यांसाठी झोकून देऊन काम करावे, अशा शब्दात श्री. वडेट्टीवार यांनी सरकारचे कान टोचले. आस्मानी संकटाबरोबरच तुमच्या सुलतानी संकटामुळे शेतकरी आत्महत्या करत आहे. तरी देखील तुम्ही उजळ माथ्याने राज्यात फिरताय. उरली सुरली थोडी शिल्लक असेल तर शेतकऱ्यांसाठी ठोस मदत जाहीर करा. कांदा, धान, संत्रा यांची निर्यात बंदी, कापूस, सोयाबीनची हमीभावापेक्षा कमी दराने खरेदी, इथेनॉलवर बंदी, दुधाचे दर पाडणे, बोगस बियाण्याकडे दुर्लक्ष करणे, अशा शेतकरी विरोधी धोरणामुळेच शेतकरी देशोधडीला लागला. शेतकरी आत्महत्येचं पाप तुमच्या माथी आहे.अशा शब्दात श्री. वडेट्टीवार यांनी सरकारवर विधानसभेत हल्लाबोल केला.

# खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीस अटक

आधुनिक केसरी न्यूज

**शेंदुर्णी :** ता. जामनेर - जळगाव जिल्हा पोलीस अधिक्षक एम. राजकुमार साहेब व उपविभागीय पोलीस अधिकारी पाचोरा भाग येरुडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पहूर पो. स्टे. चे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक सचिन सानप साहेब पहूर पोलीस स्टेशन व शेंदुर्णी औट पोस्ट हद्दीतील कायदे सुव्यवस्था व शांतता हिंदू मुस्लीम एकता जातीय सलोखा अबाधित ठेवण्यासाठी रात्र दिवस मेहनत घेतांना दिसत आहे. प्रत्येक गुन्ह्यात पोलिसांना यश मिळत असून उत्कृष्ठ कामगिरी पोलिसांची सुरु आहे. सहा. पोलीस निरीक्षक शशिकांत पाटील यांनी शेंदुर्णी व मेणगाव येथील भादवी कलम 376 मधील आरोपीस एका दिवसात अटक करून गजाआड केले आहे तसेच भादवी कलम 307 मधील आरोपी तात्काळ पकडून जेल मध्ये टाकले आहे, काही आरोपी अजूनही जेलमध्ये आहेत. पोलीस उपनिरीक्षक दिलीप पाटील साहेब दाखल गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यात गुन्हेगाराला शिक्षा कशी होईल यासाठी सखोल तपास करून योग्य न्याय देण्याचे काम करतात. विशेष जळगाव जिल्ह्यातील पहिली NPDA कार्यवाही ची प्रोसेस पहूर पो. स्टे. चे सचिन सानप साहेब यांनी सुरु केली आहे. पोलीस निरीक्षक सचिन सानप साहेब पहूर पो. स्टे. येथे येणे अगोदर पहूर व शेंदुर्णी हद्दीत खुलेआम चाकुहल्ले, HM दंगली इत्यादी गंभीर स्वरूपाचे गुन्हे घडत होते. गुन्हेगारावर पोलिसांचा वचक राहिला नव्हता परंतु "पहूर व शेंदुर्णी हद्दीत खाकीचा धाक संपला" अशी बातमी व्हायरल होताच पोलीस अधीक्षक एम. राजकुमार साहेब यांनी दखल घेतली. सचिन सानप साहेब यांनी पदभार स्वीकारताच कामाची झलक दाखवून पोलीस अधिक्षक साहेब यांच्या विश्वासाला खरे उतरले. तेव्हापासून पहूर व शेंदुर्णी येथे सर्व जाती धर्माच्या मिरवणुका सण उत्सव आषाढी एकादशी, गणपती, दुर्गाउत्सव, बकरीईद, रथ उत्सव यात्रा शांततेत उत्साहात पार पडले आहेत गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांवर कडक कारवाही झाल्याने गुन्हेगारीची टक्केवारी कमी झालेली दिसत आहे. कोणतीही घटना किवा गुन्हा घडण्या अगोदर पोलिसांना माहिती मिळाल्यास त्यावर उपाययोजना करतांना दिसून येतात त्यामुळे अनेक मोठ्या घटना घडल्या नाही एखाद्या सर्व सामान्य माणसाने सानप साहेब यांना रात्री अपरात्री केव्हाही फोन केला तरी ते फोन उचलतात व तात्काळ मदत करतात असा अनुभव लोकांनी बोलून दाखविला आहे . सानप साहेबांच्या कामातून खाकीचा धाक वाढला आहे लोकांना योग्य न्याय मिळत आहे अगोदर लोक पोलीस स्टेशनला जायला घाबरत होते पण आता पोलिसांच्या भरोशावर बिनधास्त जगत आहे. पोलीस अधिकारी उत्तमदादा पाटील तसेच सिंघम पोलीस निरीक्षक अरुण धनवडे साहेब यांच्या काळात गुन्हेगार पोलिसांना घाबरून पळून जात होते. जळगाव जिल्हा पोलीस अधिक्षक एम. राजकुमार साहेब व उपविभागीय पोलीस अधिकारी पाचोरा भाग येरुडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक सचिन सानप , शेंदुर्णी औट पोस्टचे पोलीस उपनिरीक्षक दिलीप पाटील , सहा. पोलीस उपनिरीक्षक शशिकांत पाटील पो. हे. कॉ. प्रशांत विरणारे , पहूर पो. स्टे. चे गोपाल गायकवाड , ज्ञानेश्वर ढाकणे , जिजाबराव कोकणे , विजय पाटील, मनोज गुजर हे खाकी वर्दीतील माणसे 24 तास ड्यूटी करून आपले संरक्षण करतात पण कोणीही असे समजू नये की पोलिसांशी माझी ओळखी आहे.



# भर जहागीर येथे "आपला संकल्प विकसित भारत रथाचे स्वागत"

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :**10 डिसेंबर 2023 तालुक्यातील भर जहागीर येथे जिल्हा माहिती कार्यालय द्वारे 'आपला संकल्प विकसित भारत' रथाचे स्वागत करण्यात आले.यावेळी रथाच्या माध्यमातून शासणाच्या विविध योजनांचा प्रसार व अंमलबजावणीची माहीती देण्यात आली.यावेळी निवाशी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे निवाशी उपजिल्हाधिकारी महाजन (निवडणूक विभाग) यांनी ग्रामस्थांना माहीती दिली.

स्थानिक जिल्हा परीषद केंद्रीय शाळेच्या प्रांगणामध्ये शासकीय रथासह निवाशी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे,उपजिल्हाधिकारी निवडणूक विभाग महाजन,मंडळाधिकारी समाधान जावळे,तलाठी आर.पी.जाधव यांचे ग्रामस्थांच्या वतीने स्वागत करण्यात आले.यावेळी रथाच्या माध्यमातून शासणाने राबविलेल्या विविध योजनांची माहीती ग्रामस्थांना देण्यात आली.यामध्ये ऐतिहासिक स्थळांचे पुनरूज्जीवन,स्टार्ट अप इंडिया,आत्मनिर्भर भारताच्या विकासाचे इंजिन,नव्या युगाची सुरूवात,आदीवाशी समुदायासाठी सन्मान हक्क आणि संधी महिला सक्षमीकरणाची सुनिश्चिती,आयुष्यमान भारत,वंचित सामाजिक सुरक्षा आशा विविध योजनांची माहीती देण्यात आली. यावेळी ग्रामपंचायतचे सचिव पि.बी.घुगे,सरपंच,उपसरपंच, सदस्य यांनी मान्यवरांचे स्वागत केले.यावेळी शाळेचे शिक्षक, अंगणवाडी,आरोग्य विभागासह बचत गट,व ग्रामस्थांची उपस्थिती होती.

# आचारी, केटरर्स, कामगारांनी स्वच्छतेचे भान ठेवावे

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** लग्न समारंभ, विशेष शुभ कार्य, महाप्रसाद व काल्याचे कीर्तन इत्यादी कार्यक्रम समयी हजारो नागरिक भोजन घेतात. या समयी मोठ्या प्रमाणात स्वयंपाक केला जातो अशा समयी वरील घटकांनी भोजन तयार करताना स्वच्छता, शुद्धता व दर्जेदार ताजे जेवण तयार करावे शिळ्या अन्नातून विषबाधा प्रमाण वाढत आहे. यासाठी सर्वांनी मोठ्या प्रमाणात स्वयंपाक करताना अति दक्षता पाळावी असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी रविवार(ता,११)रोजी वैष्णवी लान येथे केले. निमित्त होते पुष्प ब्रँड मसाला व सिद्धी विनायक ट्रेडर्स यांनी आयोजित केलेल्या आचारी, केटर्स, हॉटेल, व रेस्टॉरंट येथे काम करणाऱ्याचे संमेलन, या संमेलनात तालुक्यातील ग्रामीण भागातील आचारी व दुकानदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. मसाले किंवा ईतर पदार्थ वापरताना भेसळ होणार नाही याची दक्षता घेण्याचे आवाहन ही त्यांनी केले,या निमित्त पुष्प ब्रँड मल्याच्या वस्तूंचे प्रदर्शन ही आयोजित करण्यात आले होते,अध्यक्षस्थानी किराणा व्यापारी संघाचे अध्यक्ष प्रकाश शेठ बोथरा होते,तर प्रमुख पाहुणे मराठवाडा चेंबर्स ऑफ कॉमर्सचे मराठवाडा उपाध्यक्ष काशीनाथशेठ गायकवाड होते,गोकुळ जुनागडे, यांनी प्रास्ताविक केले,तर राजीव क्षीरसागर व हरिदास क्षीरसागर यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

# डॉक्टरला मारहाणप्रकरणी तरुणावर गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपरी :** उपचारादरम्यान वडिलांचा मृत्यू झाल्यानंतर वायसीएम रुग्णालयाच्या डॉक्टरला शिवीगाळ आणि मारहाण करणा-याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. ही घटना रविवारी घडली. महेश राजाराम कुंभार (वय २५ रा. वाघोली, पुणे) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत डॉ. ऋषीकेश हनमंत कुदळे (वय २५) यांनी पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपी महेश याचे वडील राजाराम कुंभार वायसीएम रुग्णालयात दाखल होते. उपचारादरम्यान त्यांचे रविवारी निधन झाले. डॉ.ऋषीकेश यांनी ही माहिती नातेवाईकांना दिली. महेश वॉर्डमध्ये आला. वडिलांच्या मृत्यूबाबत डॉक्टरांकडे विचारपूस केली. त्यानंतर रागात येऊन, मोठ्याने ओरडून डॉ. ऋषीकेश यांच्या हाताला हिसका मारला. कानशिलात लगाविली. अश्लिल शिवीगाळ केली. पिंपरी पोलीस तपास करत आहेत.

# इंदिराबाई ललवाणी महाविद्यालयाची अमृतसर-आग्रा येथे शैक्षणिक सहल

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** जामनेरपुरा येथील इंदिराबाई ललवाणी कनिष्ठ महाविद्यालयाची इयत्ता ११ व १२ वी कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील विद्यार्थिनींची शैक्षणिक सहल दि.११ ते १७ डिसेंबर दरम्यान अमृतसर- आग्रा या ठिकाणी संपन्न होत आहे यासाठी आज सकाळी ७ वा.भुसावळ येथून अमृतसर एक्सप्रेसने सहल रवाना झाली.

भारतातील ऐतिहासिक पर्यटन स्थळ,भौगोलिक दृष्ट्या अभ्यास व्हावा या उद्देशाने शैक्षणिक सहलीच्या आयोजन करण्यात आले आहे, भारतातील अमृतसर येथील प्रसिद्ध सुवर्ण मंदिर, जालियनवाला बाग, अटारी वाघा बॉर्डर,आग्रा येथील ऐतिहासिक ताजमहल,आग्रा फोर्ट,भगवान श्रीकृष्ण जन्मभूमी मथुरा,ऐतिहासिक प्रेम मंदिर वृंदावन अश्या विविध ठिकाणी १२५ विद्यार्थिनी व १० शिक्षक या प्रेक्षणीय स्थळांना भेट देणार आहे. मुख्याध्यापक एस.आर. चव्हाण,उपप्राचार्य प्रा.के एन मराठे,पर्यवेक्षक प्रा.के डी निमगडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहल प्रमुख प्रा.विजय पाटील, ज्येष्ठ शिक्षक प्रा.जी जी अत्तरदे, प्रा.डी.झेड.गायकवाड, प्रा. आर. आर पाटील,प्रा.सविता महाजन, प्रा. माधुरी महाजन, प्रा.वैशाली पाटील, प्रा.राजश्री पाटील, प्रा.सचिन बावस्कर, क्रीडा शिक्षक प्रा.समीर घोडेस्वार सहलीसाठी परिश्रम घेत आहे.



## शाळा सुरु करण्याच्या आमिषाने एक कोटी १७ लाखांची फसवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे:** शाळा सुरू करण्याच्या आमिषाने एक कोटी १७ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी प्राचार्यांसह तिघांविरुद्ध येरवडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याप्रकरणी सी. पी. गोयंका इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्य शेफाली तिवारी, तन्मय शर्मा, रोहित भार्गव यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत पूर्णिमा मिलिंद कोठारी (वय ६३, रा. उत्तम टॉवर, नगर रस्ता, येरवडा) यांनी येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सी. पी. गोयंका इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्य शेफाली तिवारी आणि पूर्णिमा तिवारी यांचा परिचय आहे. आयुष्यमती ट्रस्टच्या संचालक असल्याची बतावणी तिवारी यांनी कोठारी यांच्याकडे केली होती. २०१९ मध्ये तिवारी यांनी त्यांना आयुष्यमती ट्रस्टकडून कॅनरी इंटरनॅनशल हायस्कूल सुरु करण्यात येणार असल्याचे सांगितले. येरवड्यातील शास्त्रीनगर परिसरात कॅनरी इंटरनॅशनल स्कूल सुरू करण्यात आली. शाळेत भागीदार म्हणून कोठारी यांना रक्कम गुंतविण्यास सांगण्यात आले. एक ते दोन वर्षांसाठी गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष कोठारी यांना दाखविले. त्यानंतर तिवारी यांनी कोठारी यांच्याकडून एक कोटी १७ लाख ६७ हजार ५७९ रुपये घेतले. कोठारी आणि त्यांचा मुलगा शाळेत ७० टक्के भागीदार होते. तिवारी यांनी त्यांना कोणतेही अधिकार दिले नाही. शाळेच्या बँक खात्यावर शैक्षणिक शुल्कापोटी जमा होणारा निधी तिवारी यांनी वापरला. दरम्यान, शाळा बंद पडली. शाळेला परवानगी नसल्याने शाळा बंद पडली, असे तिवारी यांनी विद्यार्थी आणि पालकांना सांगितले. शाळा बंद पडण्यामागे कोठारी कारणीभूत असल्याचे सांगून त्यांची बदनामी केली.

फसवणूक केल्याप्रकरणी कोठारी यांनी न्यायालायत खासगी फौजदारी दावा दाखल केला. न्यायालयाने तिवारी यांच्यासह तिघांविरुद्ध कलम १५६ (३) विरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. पोलीस उपनिरीक्षक नांगरे तपास करत आहेत.




# नोंदणीकृत सर्व उमेदवारांच्या नोकरीसाठी शासन पाठपुरावा करणार : फडणवीस

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** आजपर्यंत देशात अनेक राज्यात रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. मात्र महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत नागपूर येथे आयोजित नमो महारोजगार मेळावा हा देशात अभुतपूर्व ठरला आहे. दोन दिवसीय या मेळाव्यात ६७ हजार ३७८ उमेदवारांनी नोंदणी केली असून यापैकी ११०९७ उमेदवारांना रोजगार उपलब्ध झाला आहे. नोंदणी झालेल्या उर्वरीत सर्व उमेदवारांच्या नोकरीसाठी शासन पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापिठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवन परिसरात आयोजित नमो महारोजगार मेळाव्याच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मंचावर कौशल्य, रोजगार, उद्योजकता, व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार प्रसाद लाड, प्रवीण दटके, विभागाचे अपर मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, विभागाचे आयुक्त डॉ. रामास्वामी एन., व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे संचालक दिगांबर दळवी, शिवानी दाणी आदी उपस्थित होते.

नागपूर येथील नमो महारोजगार मेळाव्यात उद्योग क्षेत्रातील नामांकित कंपन्यांनी सहभाह नोंदवून एक विक्रम केला आहे, असे सांगून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, देशात सर्वाधिक रोजगार देणारा हा मेळावा ठरला आहे. यासाठी कौशल्य विकास विभागाने विशेष पुढाकार घेतला असून सर्वांच्या मेहनतीने आणि समन्वयातून हा मेळावा यशस्वी ठरला आहे. मुलाखतीच्या माध्यमातून काही लोकांना प्रतिवर्ष 10 लक्ष रुपयांचे पॅकेज मिळाले असून ही नमो महारोजगार मेळाव्याची फार मोठी उपलब्धी आहे. विशेष म्हणजे विविध कंपन्यामध्ये रोजगार मिळालेल्या 11097 उमेदवारांना नाविन्यपूर्ण कल्पनेतून एकाच क्लिकद्वारे नियुक्तीपत्र देण्यात आले आहे.

# करखेलीच्या देशी दारूभट्टीला अभय कोणाचे?

## दारू तस्करीवर उत्पादन शुल्क विभाग व पोलीस प्रशासनाचे मौन

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** तालुक्यातील करखेली येथील देशीदारू दुकानातून जवळपासच्या खेड्यात खुलेआमपणे देशीदारूची तस्करी होते.तरीही बिलोलीच्या उत्पादन शुल्क विभागाचे आणि धर्माबादच्या पोलीस प्रशासनाचे मौन का? हा कोड्यात टाकणारा प्रश्न आहे.

धर्माबाद तालुक्यातील करखेली हे सर्वाधिक लोकसंख्या असणारे गाव आहे.५००० पेक्षा अधिक करखेलीची लोकसंख्या आहे.येथील देशी दारू दुकानातून रावधानोरा, बोळसा, जुन्नी, राजापूर, पांगरी, उमरी व धर्माबाद रोडवर धाब्यावर दारूचे बॉक्स गाडीवर पार्सल होतात अशा स्थानिक नागरिकांच्या तक्रारी आहेत. महत्वाचे म्हणजे ह्या देशी दारू भट्टीला परवाना देत असताना नेमकी कोणती जागा दिली? त्या जागेचा नकाशा, सर्व्हे नं. कोणते आहे? हे सर्व गौडबंगाल असल्याची समजते. अन्यथा



ह्या देशी दारू दुकानापासून अवघ्या १०० फुटाच्या अंतरावर मुलींची शाळा आहे. विठ्ठल मंदिर व राम मंदिर, मारोती मंदिर आहे.तसेच नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँक आहे. देवालय व विद्यालयाच्या शेजारी मद्यालयाला परवाना मिळालाच कसे हे पण एक गुपितच आहे. ह्या तळीरामाचा नाहक त्रास विद्यार्थी, मंदिरात येणारे भक्त, बँकेत येणारे ग्राहक व आठवडी बाजाराला येणाऱ्या महिलांना होतं असतो. हे सर्व होतं असताना धर्माबादचे पोलीस प्रशासन, करखेलीचे बिट जमादार आणि उत्पादन शुल्क विभाग मात्र सुस्त आहे.काही दिवसापूर्वी भाजपचे दत्ता शेंबाळे यांनी उपजिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार ही केली होती. ह्या दारू दुकानाचा परवाना आहे का? असेल तर ते नेमके कोणत्या जागेवर आहे? ग्रामपंचायतीचे, परिसरातील नागरिकांचे नाहरकत प्रमाणपत्र त्यांच्याकडे आहे का? देशी दारू दुकानाला केवळ जागेवरून दारू विकण्याची ते ही एका मर्यादेत दारूच्या बाटल्या एका व्यक्तीला विकण्याची परवानगी असताना पूर्ण बॉक्स चे बॉक्स एका व्यक्तीला कसे विकले जातात? यातून शासनाचा महसूल बुडत नाही का? उत्पादन शुल्क विभाग म्हणजे शासनाला सोन्याचे अंडी देणारी कोंबडी वाटते, परुंतु येथील अंडे नेमकी कोणाच्या वाटयाला जात आहेत? बिलोलीचे नेमके काय करत आहे? या सर्व प्रश्न लोकांना पडत आहेत. या देशी दारू दुकानातून होणारी दारूची तस्करी तात्काळ थांबवावी. ह्या दारू भट्टीला गावाच्या बाहेर स्थलांतरित करावे अशी मागणी जनतेतून होतं आहे. प्रशासन नेमकी काय करावाई करते याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

## गावबंदीविरोधात ओबीसी एकवटले

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांची ओबीसी भटके विमुक्त समाजाची इंदापूर येथे शनिवारी (९ डिसेंबर) भव्य सभा झाली. भुजबळांनी या सभेमधून गावबंदी कायद्याला धरून नसल्याचा पुनरुच्चार केला. तसेच सर्वपक्षाच्या नेत्यांना गावबंदी आहे, तर आमदार रोहित पवार यांच्या युवा यात्रेचे स्वागत कसे होते?, असा सवालही त्यांनी सभेत केला होता. या सभेनंतर आमदार गोपिचंद पडळकर यांच्या दिशेने चप्पल फेकण्यात आली. ही सभा आणि त्यानंतर घडलेल्या घटनांचे पडसाद उमटण्यास सुरुवात झाली आहे. सोमवारी (११ डिसेंबर) इंदापूर बंदची हाक देण्यात आली आहे. इंदापूर येथील तरूण गावबंदीविरोधात एकवटले आहेत. ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता गरीब मराठा नागरिकांना आरक्षण मिळावे, अशी सर्व ओबीसी नेत्यांची भूमिका आहे. मात्र, काही जणांकडून लोकप्रतिनिधींना गावबंदी, जाळपोळ करण्यात येत आहे. जोवर नेत्यांना करण्यात आलेली गावबंदी उठविली जात नाही, तोवर ओबीसी आंदोलन थांबणार नाही, असे डॉ. शशिकांत तरंगे, पांडुरंग शिंदे, माउली वाघमोडे यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.




## एमआरईजीएस अंतर्गत बंद कामे सुरु करा

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** तालुक्यामध्ये एम आर ई जी एस अंतर्गत बरीच कामे मंजूर आहेत. परंतु स्थानिक राजकीय पुढऱ्यांच्या हेव्या दाव्या मूळे प्रशासनानावर दबाव टाकून कामे बंद करण्यात आली आहेत.जिंतूर तालुक्यामध्ये दुष्काळ असून तालुक्यातील मजुरांच्या हाताला काम नाही त्यामुळे बरेच नागरिक ऊसतोडी साठी स्थलांतरित होत असून त्यांची मुले शिक्षणापासून वंचित राहत असल्याचे देखील निवेदनात नमूद केले आहे. तसेच एम आर ई जी एस अंतर्गत मंजूर कामे तातडीने सुरु न केल्यास काँग्रेस पक्षा तर्फे तीव्र आंदोलन करण्याचा ईशारा सदर निवेदनात देण्यात आला. या प्रसंगी काँग्रेस जिल्हा कार्याध्यक्ष नानासाहेब राऊत, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र नागरे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस उपाध्यक्ष ओ बी सी विभाग केशवराव बुधवंत, काँग्रेस शहर अध्यक्ष बासु पठाण, काँग्रेस जिल्हा सरचिटणीस प्रदीपराव देशमुख,महेशराव सांगळे,तालुका संघटक इर्शाद पाशा चांद पाशा,जांब सरपंच योगेश बुधवंत, सोनापूर सरपंच, दीपक चव्हाण,चारठाणा माजी उपसरपंच तहसीन देशमुख,बाबू राज, राजेंगांव , या सह काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी) • त्वचा व गुप्त रोग • वजन वाढविणे
• आम वात उदर रोग • स्त्रीयांचे आजार • वजन कमी करणे
• दमा व ॲलर्जी (जुनाट) • स्थूलपणा, मूळव्याध • केसांच्या सर्व तक्रारी
• चिकन गुनिया • वंध्यत्व, संतती प्राप्ती • लहान मुलांची
• मनोकयीईक आजार • कॅन्सर सल्ला, मुतखडा • स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# श्री संत कवी दासगणू महाराज पुण्यतिथीनिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्त शिर्डीतर्फे वस्त्र अर्पण

आधुनिक केसरी न्यूज



**उमरी :** संतकवि दासगणु महाराज पुण्यतिथी निमित्त प्रतिवर्षी प्रमाणे या वर्षी ही गोरठे येथे श्री साईबाबा संस्थान शिर्डी (गुरू घर) तर्फे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री पी. शिवा शंकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली,शिर्डी संस्थान मंदीर चे आधिक्षक श्री रमेश चौधरी साहेब, संस्थानचे पुजारी श्री उपेंद्र पाठक महाराज, जनसंपर्क कार्यालय चे श्री नवनाथ मते, चोफदार श्री नामदेव डोमे, चालक वैभव दारके यांनी संतकवी दासगणू महाराज यांच्या पुणयतिथीनिमित्त संस्थानं तर्फ समाधीस वस्त्र अर्पण केली, व गोरठे संस्थानंच्या विश्वस्त मंडळ श्री शिरीष भाऊ देशमुख गोरठेकर, सुभाषराव देशमुख, श्री विनायकराव नांदेडकर, गोविन्दराव शिरुरकर, श्री विक्रम महाराज, श्रीमती विमलताई, शिवा गोडगे यांना साई प्रसाद दिला. ही परंपरा चालु करण्या साठी साई संस्थानं चे मा.विश्वस्त श्री सुरेश वाबळे पाटील यांची मुख्य भूमिका आहे. तसेच गोरठे संस्थानतर्फे श्री विनायकराव, श्री गोविन्द शिरूकर, शेंदूरवाडकर,विक्रम महाराज यांनी शिर्डी संस्थान मंदीर चे आधिक्षक श्री रमेश चौधरी साहेब, संस्थानं चे पुजारी श्री उपेंद्र पाठक महाराज, जनसंपर्क कार्यालय चे श्री नवनाथ मते , चोफदार श्री नामदेव डोमे, चालक वैभव दारके यांचा सत्कार केला. या वेळी साई पालखीचे श्री विष्णू भाऊ अट्टल, अशोक मामीडवार, प्रवीण सारडा, गोविन्द नलबलवार, सुरेश पबितवार, गोरठे संस्थानं चे पुजारी श्री विकास आनंद गोसावी, दीपक शिरणेवार व सर्व भक्त मंडळ व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# पतीच्या विरहात पत्नीची आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** पतीच्या मृत्यूनंतर एकाकी पडलेल्या महिलेने नैराश्यातून गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना रविवारी सायंकाळी म्हाळगीनगरात उघडकीस आली. सोनाली अजय खर्चे (३८, साई एजन्सी अपार्टमेंट, म्हाळगीनगर) असे मृत महिलेचे नाव आहे. सोनाली यांनी अजय खर्चे यांच्याशी दहा वर्षांपूर्वी प्रेमविवाह केला होता. त्यांना ८ वर्षांची मुलगी आहे. गेल्या तीन वर्षांपूर्वी पती अजय यांचे करोनाने निधन झाले. तेव्हापासून त्या सदनिकेत मुलीसह राहत होत्या. त्या एका बँकेत नोकरीवर होत्या. शेजारी राहणाऱ्या आई-वडिलांकडे त्या मुलीला सोडून बँकेत जात होत्या. बँकेतून परत येताना मुलीला घेऊन घरी जात होत्या. ७ डिसेंबरला त्या मुलीला आईवडिलांच्या घरी सोडून नोकरीवर निघून गेल्या. त्याच दिवशी मुलीच्या मैत्रिणीचा वाढदिवस असल्यामुळे त्या मुलीला घ्यायला आल्या नाहीत. दुसऱ्या दिवशी त्या नेहमीप्रमाणे नोकरीवर निघून गेल्या. मात्र, शनिवारी त्या मुलीला घ्यायला आल्या नाहीत. आईने सोनाली यांना फोन केला असता प्रतिसाद मिळाला नाही. ९ डिसेंबरला वडिल मुलीच्या घरी गेले. तर त्यांना दार आतून लावलेले दिसले. त्यांनी आवाज दिला असता मुलीने प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे त्यांनी शेजाऱ्यांना गोळा करून दरवाजा तोडला. सोनाली या गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आल्या. हुडकेश्वरचे पोलीस उपनिरीक्षक पांडे यांनी पंचनामा केला.




# साहाय्यक पोलीस निरीक्षक विलास मोरे उत्कृष्ट कामगिरीबद्दल सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार पोलिस ठाण्याअंतर्गत सहाय्यक पोलिस निरीक्षक विलास मोरे यांच्यासह कर्मचाऱ्यांनी मागील तीन महिन्यात केलेली काम पोलीस दलाच्या कामगिरी मध्ये सुधारणा होवुन लोकांना पोलीस दलाकडून चांगल्यातली चांगली तत्पर सेवा देण्यासाठी तसेच लोकांची पोलीसांची प्रतिमा उंचवण्यासाठी तसेच स्पर्धेतुन चांगली कामगिरी घडण्यासाठी देश पातळी व राज्य पातळीवर सर्वोत्कृष्ठ पोलीस स्टेशनची प्रत्येक वर्षी निवड केली जाते. त्याच धर्तीवर छत्रपती संभाजीनगर ग्रामीण चे पोलीस अधीक्षक श्री. मनिष कलवानिया साहेब, यांनी तीन महिन्यातील चांगल्या कामगीरीसाठी पोलीस स्टेशनची स्पर्धा घेवुन त्यात निवडल्या जाणा-या पोलीस स्टेशनला प्रशंसापत्र व ट्रॉफी दिल्या जाते. या निवडीच्या निकषामध्ये पोलीस स्टेशनची गुन्हे निर्गती, मुद्देमाल निर्गती, न्यायालयात चालु असलेल्या प्रकरणामध्ये शिक्षेचे प्रमाण, पाहिजे, फरारी आरोपीतांचा शोध, अवैध धंद्यावरील कार्यवाही, गुन्हातील आरोपीतांवर केलेली प्रभावी प्रतिबंधक कार्यवाही, गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण, गुन्हातील जप्त मुद्देमालाचे प्रमाण समन्स-वारंटचे तामीलीचे प्रमाण, सीसीटीएनस प्रणाली चे गुन्हे भरण्याचे प्रमाण, हरवलेल्या व्यक्तींचा शोध अशा सर्व प्रकारच्या कामगिरीचा आढावा घेवुन त्यामध्ये गुणांची बेरीज छत्रपती संभाजीनगर ग्रामीण जिल्हातील २३ पोलीस स्टेशन पैकी ज्या पोलीस स्टेशनचे गुण सर्वात जास्त येतात त्या पोलीस स्टेशनची निवड सर्वोत्कृष्ठ पोलीस स्टेशन म्हणून केली जाते.तसेच प्रत्येक घटकावर चांगली कामगिरी करणा-याची सुध्दा निवड केली जाते त्या घटकातील सर्वोत्कृष्ठ दोषसिध्दी मध्ये (न्यायालयात चालु असलेल्या प्रकरणामध्ये शिक्षेचे प्रमाण) सुध्दा पोलीस स्टेशन वडोदबाजारची निवड झाली आहे. या सर्वोत्कृष्ठ पोलीस ठाणे, सर्वोत्कृष्ठ दोषसिध्दी पारितोषिकासाठी वडोदबाजार पोलीस ठाणे येथील सर्व अधिकारी व अंमलदार यांनी मेहनत घेतली आहे.

आज माहे डिसेंबरच्या गुन्हे आढावा बैठकीमध्ये मा. पोलीस अधीक्षक श्री मनीष कलवानिया साहेब, अप्पर पोलीस अधिक्षक श्री सुनिल लांजेवावर साहेब, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण यांनी सर्वोत्कृष्ठ पोलीस स्टेशनसाठी पोलीस ठाणे वडोदबाजार सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री विलास मोरे यांना प्रशंसापत्र व ट्रॉफी देवून सन्माणीत केले. तसेच दोषसिध्दी मध्ये सर्वोत्कृष्ठ कामगिरीसाठी पोलीस ठाणे वडोदबाजार येथील कोर्ट पैरवी अधिकारी, ग्रेड पोउपनि श्री राजेश दवंगे व पोलीस हवालदार श्री नितीन बोरसे यांना प्रशंसापत्र व ट्रॉफी देवून सन्मानित केले. यांचा सन्मानपत्र देऊन गौरव केला आहे.

# वनरक्षकावर बिबट्याचा हल्ला

## एकटे जंगलात किंवा शेतात जाऊ नये : वनाधिकारी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्याच्या पानवाडी, चिंचोली, धामणगाव, पोफडा या गावाच्या डोंगराळ भागात दिनांक 10 डिसेंबर 2023 रविवार रोजी सकाळी पानवाडीच्या शेजारी एक बिबट्या येथील नागरिकांना दिसून आला. बिबट्या दिसताच नागरिकांनी आरडाओरडा केला असता पानवाडी चिंचोली गावातील अनेक नागरिक बिबट्याच्या दिशेने डोंगराळ भागात धावून आले व काही नागरिकांनी फुलंब्री पोलीस ठाणे तसेच वन अधिकाऱ्यांना फोन करण्यात आला वन अधिकारी यांना फोन केले असता वनरक्षक त्या ठिकाणी आले आणि ज्या जाळीमध्ये बिबट्या लपून बसला होता त्या जाळीजवळ शहानिशा करण्याकरिता गेले असता बिबट्याने चौताळून एकदम वनरक्षक कुंटे यांच्यावर हल्ला चढवला व दोन्ही पंजे कुंटे यांच्या मानेवर मारले परंतु त्यांच्या मागेच असलेले पानवाडी चे अजीम पटेल व इतर सहकाऱ्यांनी आरडाओरडा करून लाकड्या काठ्या दाखवून बिबट्याला हुस्काऊन लावले त्यामुळे वनरक्षक



कुंटे यांचा जीव वाचला व ते गंभीर जखमी झाले वनरक्षक कुंटे यांना लगेच तेथील नागरिकांनी एका वाहनातून औरंगाबाद येथे दवाखान्यात घेऊन गेले. या घटनेची बातमी वाऱ्यासारखी सोशल मीडियावर पसरली असता त्या ठिकाणी सिल्लोड फुलंब्री भागाचे रेंज वन अधिकारी संजय भिसे हे फौज फाट्यासह बिबट्या लपेल्या भागाजवळ पोहोचले व पानवाडी चिंचोली धामणगाव या भागातील नागरिकांना रेंज वन अधिकारी संजय भिसे यांनी असे सांगितले की बिबट्या एकाच ठिकाणी थांबत नाही लोकांची गर्दी कमी झाली की तो स्वतःहून तिथून निघून जाईल पण येथे जमा असलेल्या नागरिकांचे असे म्हणणे होते की त्या बिबट्याला आमच्या समोरच आमच्या जंगलातून हुस्काऊन द्या आम्ही सर्व नागरिक इथे उभे राहत नाही कमीत कमी प्रत्येक गावातील एक एक दोन दोन नागरिक इथं राहणार त्यांच्या समक्ष तुम्ही त्याला येथून हाकलून द्या म्हणजे आम्हाला समाधान होईल. वन अधिकाऱ्यांनी त्या बिबट्याला पिंजरा आणून पकडावे किंवा आमच्या भागातून दूर करावा नसता कोणत्याही प्रकारच्या जीविताचे नुकसान किंवा घातपात झाले तर वन अधिकारी त्याचे जिम्मेदार राहणार असे येथे जमा असलेल्या नागरिकांचे म्हणणे होते.

संध्याकाळी उशिरापर्यंत वन अधिकारी बिबट्याचा शोध घेत होते पण तो काही जंगलातून बाहेर निघाला नाही

या ठिकाणी फुलंब्री पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप राजपूत यांच्या सह पोलीस स्टाफ सुद्धा हजर होते.



# भाजपा फुलंब्री तालुका उपाध्यक्षपदी बनसोडे

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** भारतीय जनता पार्टीच्या वतीने राम बनसोड यांची तालुका उपाध्यक्षपदी निवड निवड झाल्याने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे माजी विधानसभा आमदार हरिभाऊ बागडे भाजपा जिल्हाध्यक्ष सुहास भाऊ शिरसाठ भाजपा तालुका अध्यक्ष सांडू जाधव भाजपा शहराध्यक्ष योगेश मिसाळ भाजपा महिला जिल्हाध्यक्ष पुष्पाताई काळे ऐश्वर्या गाडेकर गंगाधर ताटे सरसाताई वाघ रत्नाकर ताई सोनवणे सविताताई नवले राणीताई सोनवणे सुचित बोरसे राजेंद्र डकले पंडित नागरे बाळासाहेब तांदळे मयूर कोलते अंबादास जाधव संतोष जाधव भगवान निराशे सुदाम पवार सचिन शेरकर अजय नागरे दिनेश शेरकर व भाजपा कार्यकर्ते आणि मित्र मंडळ उपस्थित होते.



## पिकअप दरीत कोसळून एक ठार

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** नाशिक मुंबई महामार्गावरील कसारा घाटातील



घाटनदेवी मंदिरासमोर असलेल्या उंट दरीत शनिवारी मध्यरात्री साडेबारा वाजेच्या सुमारास घोटीहून मुबंईकडे भाजी पाला घेऊन जाणाऱ्या पिकअप टेम्पो चालकाचे गाडी वरील नियंत्रण सुटल्याने पिकअप टेम्पो चालकासह ४०० फुट खोल दरीत कोसळल्याने झालेल्या अपघातात टेम्पो चालकाचा मृत्यू झाला. मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास घोटीहून भाजीपाला घेऊन मुंबईकडे निघालेला पिकअप टेम्पो क्रमांक एम एच 15 जे. सी. 8536 हा कसारा घाट मार्गे जात असता घाटनदेवी मंदिरासमोरील उंट दरी समोर पिकअपचा चालक विकी तांबे याला अज्ञात वाहनाने कट मारला. त्यामुळे पिकअप चालकाचा आपल्या गाडीवरील ताबा सुटला व टेम्पो थेट उंट दरीच्या वर असलेल्या कठड्याला धडकला. परंतु कथडे कालबाह्य असल्याने ते कथडे तोडून पिकअप चालकासाह थेट ४०० फूट खोल दरीत कोसळला. या अपघाताची माहिती महामार्ग पोलीस सुनील खताळ यांना समजताच त्यांनी इगतपुरी पोलीस कसारा पोलीस ठाण्याला कळवून घटनास्थळ गाठले. त्यावेळी गाडी थेट दरीत गेल्याची खात्री पटल्यावर महामार्ग पोलिसांनी कसारा येथील आपत्ती व्यवस्थापन टीमचे शाम धुमाळ यांना माहिती देत मदतीसाठी बोलवले.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन कसारा घाटातील अपघात ठिकाण असलेल्या उंट दरीतील अपघात ग्रस्थांना मदतीसाठी आपत्ती व्यवस्थापन टीमचे शाम धुमाळ, दत्ता वाताडे, देवा वाघ, स्वप्नील कळत्री, जस्विंदर यांनी घटनास्थळी धावं घेतली व तात्काळ ३५० ते ४०० फूट खोल दरीत उतरण्यासाठी नियोजन सुरु केले. रात्री एक वाजेच्या दरम्यान आपत्ती व्यवस्थापन टीमचे सदस्य दरीत उतरण्यासाठी सज्ज झाले. महामार्ग पोलीस घोटी केंद्र, इगतपुरी पोलीस, कसारा पोलीस व टोल प्रशासनाच्या मदतीने टीम सदस्य दरीत उतरले व त्यांनी भाजीच्या ढिगाऱ्याखाली अडकलेला विकी राजाराम् तांबे, वय २२ रा. घोटी याचा मृतदेह तब्बल तीन तासांच्या अथक परिश्रमानंतर मृतदेह ४०० फूट वर घेऊन आल्यानंतर मृतदेह पोलीसांच्या ताब्यात दिला. विकी तांबे याचा मृतदेह शवविच्छदनासाठी 1033 रुग्णवाहिकेतून इगतपुरी ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला. या प्रकरणी पोलीस पुढील तपास करीत आहेत. दरम्यान अति धोकादायक दरीत उतरून अपघात झालेल्या पिकअप चालकाचा मृतदेह वर काढून पोलिसांच्या ताब्यात दिल्याने उपविभागीय पोलीस अधिकारी शहापूरचे मिलिंद शिंदे, इगतपुरीचे पोलीस निरीक्षक राजू सुर्वे, कसारा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी रमेश तडवी यांनी आपत्ती व्यवस्थापन टीमच्या सदस्याचे कौतुक करीत आभार मानले. उंट दरीचे संरक्षक कथडे मजबूत करण्याची गरज असुन कसारा घाटातील पर्यटकांसाठी सेल्फी पॉईंट असलेल्या उंट दरीतील परिसरात व दरीच्या वरील भागात वनविभागाने मजबूत असे संरक्षक कथडे उभारावे अशी मागणी होत आहे.

# पुलाअभावी शेतकऱ्यांचा जीवघेणा प्रवास

## महागाव येथील 'महा'समस्या : संबंधित प्रशासनाचे दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** जिल्हयातील रिसोड तालुक्याच्या शेवटच्या टोकावर असलेले महागाव हे जिल्हयातील सर्वात मोठी नदी असलेल्या पैनगंगा नदीच्या तीरावर वसलेले गाव आहे. याच नदीवर बांधण्यात आलेल्या कोल्हापुरी बंधाऱ्याचे पाणी आडवील्यानंतर पैलतीरावर असलेल्या शेतात जाण्यासाठी येथील शेतकऱ्यांना जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. अन्यथा १५ की.मी. चा फेरा पुर्ण करुन शेतात जावे लागत आहे. शिवाय गोहोगाव येथील नागरिकांचे पोस्ट महागाव असल्याने संबंधीत कामांची सुद्धा पंचाईत झाली आहे. दररोजच्या या "महा " समस्येला तोंड देता देता नाकीनऊ आलेले शेतकरी संबंधीत प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्याप्रती रोष व्यक्त करीत आहेत. महागावच्या स्मशाभूमी जवळून जाणारा सदर रस्ता गोहगाव (हाडे) या गावाला जोडणारा पूर्ववहीवाटचा रस्ता आहे. गोहोगाव या गावाचे पोस्ट कार्यालय महागाव असल्याने सर्वात जवळचा व सोईस्कर म्हणून दोन गावांना जोडणारा प्रचलीत रस्ता आहे. तद्वतच महागाव येथील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी पैनगंगा नदीच्या पैलतीरावर असून सबंधित शेतकऱ्यांचा हा मुख्य शेतरस्ता आहे. मात्र नजीकच्या बाळखेड येथे पैनगंगा नदीवर बांधलेल्या कोल्हापुरी बंधाऱ्यामुळे सदर रस्ता भूतकाळात जमा होण्याच्या मार्गावर आहे. या गंभीर बाबीकडे संबंधीत प्रशासन आणि लोकप्रतिनिधी कानाडोळा करत असल्याने



दैनंदिन कामासाठी शेतात जाणाऱ्या शेतकऱ्यांना घरगुती शक्कल लढवून धोकादायक साधनांचा उपयोग करून जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. घरगुती वापरातील पाण्याच्या टाक्या हवाबंद करून त्यावर खाट बांधून तयार झालेल्या साधनाचा पैलतीरी जाण्यासाठी होडी म्हणुन उपयोग करण्यात येत आहे. या बाबत काही शेतकऱ्यांना विचारणा केली असता, " हाकेच्या अंतरावर असलेल्या शेतात जाण्यासाठी महागाव ते वाकद ५की.मी वाकद ते गोहोगाव ५ की.मी. आणि परत गोहगाव ते शेत ५ की.मी असा पंधरा किलोमीटरचा फेरा पुर्ण करुन शेतात जावे लागत असल्याची धक्कादायक माहिती संबंधीत शेतकऱ्यांकडून मिळाली आहे." परिणामी नाहकचा त्रास सहन करुन शेतकऱ्यांचा वेळ देखील फुकटचा वाया जात असल्याने सदर शेतकरी हा जीवघेणा प्रवास करत असल्याचे वास्तव समोर आले आहे. कदाचीत अशा धोकादायक घरगुती होडीचा उपयोग करतांना पाण्याने तुडुंब भरलेल्या नदीपात्रात काही अपघात झाल्यास एखादी दुर्दैवी अप्रिय घटना घडण्यास वेळ लागणार नाही अशी भयावह परिस्थिती सबंधित शेतकऱ्यांच्या नशिबी उतरली आहे. आणि ही परिस्थिती केवळ कोल्हापुरी बंधाऱ्याचे पाणी अडविल्या नंतरच उद्भवते असे नाही, तर अजिंठ्याच्या डोंगरातून उगम पावलेल्या पैनगंगा नदीला पावसाळ्यात सुद्धा खुप मोठया प्रमाणात सतत पाणी वाहत असते. त्यामूळे पावसाळ्याच्या दिवसात देखिल शेतकऱ्यांची हीच अवस्था असते असे त्रस्त शेतकरी बोलत आहेत. महागावच्या शेतकऱ्यांची ही " महा " समस्या आजचीच नसून गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. या गंभीर समस्येकडे सबंधित प्रशासनाचे दुर्लक्ष तर होतच आहे,पण जिल्हयातील आजी, माजी आमदार, खासदार व इतर स्थानिक लोकप्रतिनिधींचा दुर्लक्षितपणा सुद्धा तीतकाच जबाबदार असल्याचे महागाव येथील संतप्त नागरिक बोलत आहेत. या बाबत कोणीतरी पुढाकार घेऊन शेतकऱ्यांचा हा जीवघेणा प्रवास थांबवावा अशी अपेक्षा त्रस्त शेतकऱ्यांनी "आधुनिक केसरी " सोबत बोलतांना व्यक्त केली आहे.

५ ट्रिलियन इकॉनॉमीचे उद्दिष्ट पुर्ण करण्याच्या बाता हाणनाऱ्या राजकारण्यांमुळे, देश महासत्ता होण्याची स्वप्न बघत आहे .मात्र आजही ग्रामीण भागात रस्ते,वीज, पाणी अशा मूलभूत सोईसुविधाच्या अनेक समस्या " आ " वासून उभ्या आहेत . शासन आपल्या दारी ही सत्ताधाऱ्यांची वल्गना फोल असल्याचे सर्वसामान्य जनता बोलत आहे . आणि महागाव येथील शेतकऱ्यांची ही गंभीर समस्या त्याला अधोरेखित करणारी आहे .

पेननदीच्या पलीकडच्या काठावर माझे शेत असून, सदर शेतात जाणाऱ्या रस्त्याची समस्या आमच्या बापदादयापासून आजपर्यंत कायम आहे . शेतात जाण्यासाठी पुल नसल्यामुळे जवळपास २० वर्षापूर्वी शेतातून घरी परत येतांना माझे काका हिम्मतराव हुंबाड हे पुरात वाहून मृत्युमुखी पडले याचा संपूर्ण गाव साक्षीदार आहे . पुन्हा अशी दुर्दैवी घटना घडू द्यायची नसेल तर आमच्या शेतरस्त्यावर तात्काळ पुल बांधणे खुप गरजेचे आहे .
**माधव साहेबराव हुंबाड, ( शेतकरी,महागाव ता .रिसोड )**



मी, नुकतीच काही महिन्यापुर्वी लोकनियुक्त सरपंच पदावर रुजू झाली आहे . ग्रामपंचायतचे पूर्वीचे कामकाज पाहता, शेतात जाणाऱ्या जवळपास सर्वच पांदन रस्त्यांचे काम झालेले नाही . महागाव ते गौंढाळा या एकमेव शेतरस्त्याचे काम केले असून, महागाव ते करंजी या शेतरस्त्याचे काम देखिल होणे बाकी अवस्थेत आहे . मी ग्रामस्थ व शेतकऱ्यांच्या उपयुक्त कामांचा आराखडा प्रशासनाकडे प्रस्तावित केला आहे . त्याचा पाठपुरावा देखिल सुरु आहे . त्याच प्रमाणे गोहोगावकडे जाणाऱ्या शेतरस्त्यावर पुल बांधण्यासाठी सुद्धा पोटतिडकीने पाठपुरावा करणार आहे . . !"
**सौ . रुपाली संतोष मवाळ( सरपंच, महागाव )**

## सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** सशस्त्र सेना ध्वजदिन निधी 2023 संकलन शुभारंभ व ध्वजदिन 2022 उत्कृष्ट संकलन केलेल्या कार्यालयास प्रमुखांनी पारितोषिक वितरनाचा कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालय सभागृहात आज 8 डिसेंबर रोजी सकाळी 11 वाजता जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता. यावेळी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर मिलिंद तुंगार, निवासी उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे तसेच जिल्ह्यातील विविध शासकीय, निमशासकीय कार्यालयाचे प्रमुख, विविध संस्था, शाळा व महाविद्यालयाचे प्रमुख प्रतिनिधी, वीर नारी, वीर माता/पिता, माजी संघटनांचे प्रतिनिधी व माजी सैनिक आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले व शहीद सैनिकांना श्रध्दांजली वाहण्यात आली. मेजर मिलिंद तुंगार यांनी ध्वजदिनाचे महत्त्व तसेच जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध



योजनांविषयी उपस्थितांना माहिती दिली. यावेळी ध्वजदिन 2023 निधी संकलनाचा शुभारंभ जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांच्या हस्ते करण्यात आला.यावर्षी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनासाठी जिल्ह्यासाठी मागील वर्षाप्रमाणे 51 लक्ष 28 हजार रुपये इतके उद्दिष्ट ठरवून दिले आहे.हे उद्दिष्ट वेळेत पुर्तता करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी सर्वांना आवाहन केले. देशाच्या संरक्षणासाठी जवान प्रतिकुल परिस्थितीमध्ये सीमेवर आपले कर्तव्य बजावत असताना शहीद होतात.अशा शहीद जवानांच्या कुटुंबियांना जीवनातील अडीअडचणी दूर करुन त्यांचे दैनंदिन जीवन सुसह्य व्हावे,त्याचप्रमाणे युध्दात अपंगत्व प्राप्त झालेल्या आणि सशस्त्र दलातून निवृत्त झालेल्या सैनिकांसाठी या निधी संकलनात सर्वांनी योगदान दयावे, असे आवाहन डॉ.ओम्बासे यांनी केले. शासनाने धाराशिव जिल्ह्यास सन 2022 या वर्षासाठी 51 लक्ष 28 हजार रुपये इतके निधी संकलनाचे उद्दिष्ट ठरवून दिले होते. जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ध्वजनिधी संकलनाचे उद्दिष्ट 1 कोटी 18 लक्ष 42 हजार म्हणजे 231.84 टक्के उद्दिष्टपूर्ती करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गुरुनाथ कुलकर्णी व आभार अनिलकुमार मेंगशेट्टी यांनी मानले. जिल्हा सैनिक कार्यालयाचे साहेबराव वाघमारे, माजीद काझी, शैलेश देव, सुधाकर परशे, प्रकाश अडगळे, उमेश राठोड, कोमल उंबरे व छाया देडे यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर